
प्रकरण दुसरे

# रा. ना. पवारांच्या कवितेतील आशय सौंदर्य



### प्रकरण दुसरे

## रा. ना. पवार यांच्या कवितेतील आशयसौंदर्य आणि वैशिष्ट्ये

कवी रा. ना. पवार हे एका सामान्य कुटुंबातून आलेले कवी होते. त्यांच्या घराण्यात साहित्याचे व कवितेचे संस्कार व्हावेत असे कोणतेही वातावरण नव्हते. तरीही आयुष्यभर त्यांनी काव्यदेवतेची उपासना केली. जवळजवळ ६० वर्ष सातत्याने ते काव्यलेखन करीत राहिले याचे कारण काय असावे? काव्यनिर्मितीची प्रेरणा त्यांना कोठून मिळाली? याचा मागोवा घेताना असे आढळले की, त्यांचे मेव्हणे श्री इंगळे मास्तर यांच्या सहवासाने त्यांच्या मनात साहित्याविषयी प्रेम निर्माण झाले. इ. स. १९३१ मध्ये त्यांनी 'अफजलखानाचा वध' हे नाटक लिहिले. त्याच नाटकावर त्यांनी पहिली कविता लिहिली -

''प्रथमदर्शनी खानाचा वध।<br>
नाटक केले बालांनी ॥<br>
दोन पेन्सिली तिकिट ठेविले।<br>
आश्रय द्यावा संकलांनी'' ॥''

अशी एक आठवण सोलापुरातील नवोदित कवी. प्रा. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ यांनी दिली आहे.[१] इंगळे मास्तरांच्या घरी रा. ना. पवारांना 'व्युत्पत्तिप्रदीप' आणि वाचनालयात 'शब्दरत्नाकर' ही दोन पुस्तकेच त्यांना शब्दांचा डाव मांडण्यासाठी शिकवितात. ही दोन्ही पुस्तके शब्दकोश स्वरुपाची होती, व ती त्यांना फार आवडली. कारण त्यांना त्यातून शब्द, शब्दांचे अर्थ आणि शब्दाचे सौंदर्य यांची जाणीव झाली. पुढे अक्कलकोटहून सोलापुरात शिक्षणासाठी आल्यानंतर हरिभाई देवकरण प्रशालेमध्ये त्यांचा साहित्य परिमळ दरवळण्यास सुरुवात झाली. शब्दांच्या खजिन्यात तासन्‌तास रमण्याबरोबरच त्यांना संगीताचाही साज चढविण्याची आवड लहानपणापासून होती. संगीतामध्ये लयबद्धता असते आणि कवितेच्या शब्दांमध्ये लयबद्धता असते म्हणून ''Poetry is metrical composition'' असे जॉनसनने म्हटले आहे. [२]

याचा अर्थ कवितेमध्ये शब्द व लय यांना महत्व असते. रा. ना. पवारांच्या कवितेत लयबद्ध शब्दरचना का आढळते ते यातून दिसून येईल. या संदर्भात स्वतः रा. ना. पवार यांनी म्हटले आहे, '' संगीत आधी का काव्य आधी हा वाद अद्यापही अनिर्णीत असला तरी मी मात्र संगीताच्या आकर्षणामुळे काव्याकडे ओढला गेलो. लहानपणापासून देवळातून होणाऱ्या भजनात टाळ वाजविणे व भजन, गौळण म्हणणे हा आवडता छंद मला जडला होता.''[३] शब्दांचा छंद, संगीताची आवड, भजनांचा संस्कार या

सर्वांमधून त्यांची कविता विकसित होत गेली.

**कवितेचा कालखंड :**

रा. ना. पवार यांच्या काव्यलेखनाचा कालखंड फार मोठा आहे. बालपणी म्हणजे इ. स. १९३१ मध्ये त्यांनी पहिली कविता लिहिली. तेव्हापासून ते इ.स. १९९२ मध्ये जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत सातत्याने काव्यलेखन करीत राहिले, म्हणजे जवळजवळ ६० वर्ष त्यांनी काव्यरचना केली. या ६० वर्षाच्या कालखंडामध्ये त्यांनी जवळजवळ एक हजार पर्यंत कविता लिहिल्या. त्या कवितांच्या हस्तलिखित प्रती आजही त्यांचा मुलगा माधवकडे पहायला मिळतात. यातल्या बऱ्याचशा कविता महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रातून मासिकातून, दिवाळी अंकातून सातत्याने प्रकाशितही झाल्या आहेत; परंतु काव्यलेखनाच्या मानाने त्यांचे काव्यसंग्रह मात्र निघू शकले नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. म्हणूनच त्यांच्या मित्रमंडळीनी व रसिकांनी मिळून ५ नोव्हेंबर १९९३ रोजी 'सावळ्या विठ्ठला' या नावाने साठ निवडक कवितांचा संग्रह प्रकाशित केला. त्याआगोदर सन १९६२ साली चीनच्या आक्रमणानंतर त्यांनी लिहिलेल्या राष्ट्रीय कवितांचा एक छोटासा संग्रह 'संग्रामगीते' या नावाने प्रकाशित झाला. हजारो संख्येने लिहिणाऱ्या या एका चांगल्या कवीचे अवघे दोनच संग्रह निघावेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अभंग, ओवी, भावगीते,नाट्यगीते, लावण्या, पोवाडे, गौळणी अशा विविध प्रकारांमध्ये चांगल्याप्रकारे काव्यरचना केली असूनही एवढेच नव्हेतर , 'सावळ्या विठ्ठला, क्षणभर उघड नयन देवा, देवा बोला हो माझ्याशी' या अशा अनेक गीतांच्या गाजलेल्या गायिका माणिक वर्मा, सुमन कल्याणपूर, ज्योत्स्ना भोळे, इत्यादीकडून गीतांच्या रेकॉर्डस् निघूनही त्यांच्या कवितांना पाहिजे त्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. परिशिष्ट क्र १ मध्ये त्यांच्या काही प्रकाशित कवितांची नावे दिली आहेत. ती पाहता रा. ना. पवार यांनी काव्यदेवतेची सातत्याने कशी उपासना केली आहे हे दिसून येते.

**काव्यविषयक भूमिका :**

प्रत्येक कवीची काव्यलेखनामागे कोणत्यातरी प्रकारची एक विशिष्ट भूमिका असते. काही कवी सौंदर्याचा आविष्कार करण्यासाठी आणि त्याद्वारे निर्मल आनंद मिळविण्यासाठी लिहितो. तर काही कवी जीवनचिंतन, सामाजिक जीवनातील सुखदुःखे यांचा आविष्कार करण्यासाठी लिहितो. म्हणून साहित्य क्षेत्रामध्ये 'कलावादी' आणि 'जीवनवादी' असे साहित्यिक आढळतात. कवी रा. ना. पवार यांची कविता कलावादी असण्यापेक्षा जीवनवादी अधिक आहे. 'कविता' ही सौंदर्य व भावनात्मक असावी हे त्यांना मान्य आहे. पण त्याचबरोबर कवितेने जीवनातील सुखदुःखाचा

आविष्कार करावा, प्रसंगी समाजातील अन्यायाविरुद्ध कवितेने 'रणचंडीकेचे रुप' ही धारण करावे असे त्यांना वाटते. म्हणून 'कविता अशी असावी' (पृ. ४५) या कवितेत त्यांनी आपली काव्यविषयक भूमिका सुंदर आणि समर्पक शब्दांत व्यक्त केली. ते म्हणतात -

''शब्दास सूर यावा
लयतालही असावा
ते नादब्रह्म श्रवुनी
ओंकार लुब्ध व्हावा
ते गीत ऐकण्याला
वागीश्वरीच यावी ॥
कुसुमास हासवावे
वज्रास लाजवावे
हास्यांस शांतवावे
करुणेस जोजवावें
कधी ती प्रसंग येता
रणचंडिकाहि व्हावी ॥''   ('सावळ्या विठ्ठला', पृ. ४६)

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या कवितेची अशीच दोन रुपे चित्रित केलेली आहेत. त्यांना कवितेत 'रम्यता' असावी असे वाटते व त्याचप्रमाणे तिने प्रसंगी 'रौद्ररुप' धारण करावे असेही त्यांना वाटते. म्हणून ते सौंदर्याची उपेक्षा कधीही करीत नाहीत तर त्यांना कवितेमध्ये 'साजशृंगार'ही असावा असे वाटते. कविता म्हणजे 'शारदेची जणू प्रतिमा'च असावी, असे ते म्हणतात -

''शृंगार साज ल्यावी
शालीन ती दिसावी''   (सावळ्या विठ्ठला, पृ. ४५)

त्यांनी वापरलेला शालीन हा शब्द महत्वाचा वाटतो. प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रकाराने औचित्यांचा जो विचार मांडला आहे. त्यांच्याशी हा विचार जुळतो आहे.

कवीनी कविता लिहीत असताना फक्त शब्द, सूर, ताल, लय याहीबरोबर ज्या त्या वेळेनुसार तिला अवतार धारण करायला लावले पाहिजे. ज्यावेळी फुलायचे असते त्यावेळी फुलावे, ज्यावेळी लाजवायचे असते त्यावेळी लाजवावे आणि कधी कधी हसत असताना देखील शांत करण्याची,

दगडालाही पाझर फोडण्याची व वेळोवेळी बंड करुन पेटवून देणारी व प्रसंगी आगही ओकणारी असावी, असे त्यांना वाटते.

काव्यविषयक ही त्यांची भूमिका काहीशी पारंपारिक आहे. प्राचीन साहित्यावर त्यांची अभिरुची पोसलेली आहे. अर्थात आधुनिक मराठीतील नवकवितेविषयी प्रयोगशीलतेच्या नावावर वाट्टेल त्या प्रकारे लिहिण्याच्या प्रवृत्तीविषयी त्यांना चीड आहे. आजकालचे बरेचसे कवी आपली कविता आधुनिकतेच्या नावारवाली वाट्टेल त्या प्रकारे लिहितात विशेष मुक्तछंदात लिहितात, पण आपला छंद तरी कोणत्या छंदात आहे हे तरी समजायला पाहिजे असे त्यांना वाटते. कविता म्हणजे जणू एक मुलगी आहे, असे समजून त्यांनी 'मुलगी दारववावी म्हणतो' (पृ. ६९) या कवितेत जो विचार मांडला आहे तो अर्थपूर्ण आहे. ती मुलगी आधुनिक प्रकारचा शृंगार करुन फॅशनेबल बनविण्यापेक्षा जुन्या पद्धतीचाच साजशृंगार करुन ती शालीन असावी, असे त्यांना वाटते. कवितेच्या शालीनतेतच तिचे खरे सौंदर्य आहे म्हणून ते म्हणतात -

''रस, नाद, लय, ताल याति तिला गम्य आहे.
तिला पाहून रसिकता म्हणजे तिचं रुप रम्य आहे.
प्रतिभेने फुलते अलंकाराने सजते
ओज तेजाने प्रकाशते, प्रसादाने प्रसन्न होते.
शृंगाराचा साज लेवून शालीनतेला जपते
अशी आमची दुहिता
तिचं नांव कविता
सांगण्यासारखं खूप आहे
कुणालाही आवडावं असं तीचं रुप आहे
तुमचा विवेक अनुरुप आहे
जमलंच तर पहावं म्हणतो
म्हणूनच तुमच्या विवेकाला एकदा मुलगी दारववावी म्हणतो.'' ( सा.वि., पृ. ७०)

म्हणून डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहेत, ''कवितेसंबंधीच्या त्यांच्या या कल्पना कित्येकांना जुन्या किंवा पारंपारिक वाटतील. अेका अर्थानं नवकवितेपेक्षा रा.ना. हे जुन्या कवितेचेच भोक्ते होते असं म्हणता येईल. या संग्रहातल्या बहुतांश कविता छंदोबद्ध वृत्तांतून बांधलेली कविता त्यांना विशेष प्रिय होती.''[४]

डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हटल्याप्रमाणे कवी रा. ना. पवार यांना प्राचीन कवितेसंबंधी प्रेम वाटत होते. रामायण, महाभारत यासारखी काव्ये ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या ग्रंथरचना त्यांना प्रिय वाटतात; परंतु आजकालचे कवी छंदोबद्ध लिहिणाऱ्याची उपेक्षा करतात. याची त्यांना चीड वाटते म्हणून 'कवितेला फक्त पाहिजेत शब्द' (पृ. ४७) या कवितेत त्यांनी उपरोधिक शब्दांत अशा कवींचा समाचार घेतला आहे. 'लिंहू मिनिटाला कविता हो सत्रा!' असे म्हणणारे आजचे कवी नाविन्याचा ॐ करुन त्यात सत्य, शिव, सौंदर्याची आहुती देतात. याची त्यांना खंत वाटते. तसेच रसिकांना हे कवी बुद्धू समजतात याची त्यांना चीड आहे.

रा. ना. पवार यांची या वरून काव्यविषयक भूमिका व त्यांचा कवितेकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो आणि त्यांची कविता साधी, सोपी, प्रासादिक, लयबद्ध आणि जुन्या वळणाची का आहे याचाही उलगडा होतो. यांनी लिहिलेल्या कविता वाचल्या की असे जाणवते, 'त्यांनी जीवनातील सौंदर्याचे भावनात्मक चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे किंबहुना अधिक प्रमाणात त्यांनी जीवनावर, समाजातील सुखदु:खावर, विषमता व अन्याय यावर अधिक लिहिले आहेत. यातून त्यांची जीवनवादी भूमिका स्पष्ट होते', म्हणून असे म्हणावेसे वाटते की रा. ना. पवार यांची भूमिका कलावादी असूनही जीवनवादी अधिक आहे.

याच भूमिकेवरुन आपणास त्यांच्या कवितेचा शोध घ्यावा लागतो.

**जीवनविषयक कविता :-**

कवी रा. ना. पवार यांचे जीवन बालपणापासून ते जीवनाच्या अंतीम क्षणापर्यन्त दु:ख, दारिद्र्य, कष्ट, व्याधी अशा अनेक व्यथाने गारटलेले होते. त्यांच्या जीवनाचा त्यांना आलेला अनुभव हा सुखाचा, साफल्याचा, आनंदाचा फारसा नव्हता, पण असे असले तरी त्यांनी जीवनावर उत्कटपणाने प्रेम केले. माणूस सुखाच्या पाठीमागे धावतो म्हणून सुख पुढे पळते व दु:ख पाठीशी लागते, म्हणून माणसाने दु:खाच्या पाठीमागे धावत राहावे, म्हणजे दु:ख पुढे पळते व सुख आपल्या पाठीमागे लागते. अशी त्यांची जीवनविषयक धारणा आहे. जीवननिष्ठा त्यांच्या कवितेची प्रमुख प्रेरणा आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर, ''जीवनामध्ये मी प्रेम केले मनापासून, अन् भांडण केले ते ही मनापासून .... जन्मभर दु:खाला कुरवाळीत; संकटांना जिद्दीने, स्वाभिमानाने हसत सामोरा गेलो. माझ्या आईपासून मी दु:खे गिळायला शिकलो.''[५] तसेच त्यांचे एक रसिक मित्र दिवाकर दुनाखे यांनी म्हटले आहे, ''त्यांनी स्वत:च्या जीवनात ज्या हालआपेष्टा काढल्या त्याचे सहानुभूतीसाठी कधीही भांडवल केले नाही उलट जिद्दीने जीवनाचा सारीपाट मांडावा व त्यातील डाव जिद्दीने जिंकावा

म्हणून खेळ खेळायला, जय पराजय येईल तो झेलावा. पराजयाच्या खेदाने निराश न होता व जयाच्या उन्मादाने हुरळून न जाता जीवनाचे गाणे गाणारा, लावलेला सूर सातत्याने सांभाळणारा असा हा जीवनानुमुख कवी सोलापूरचे सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे एक भूषण आहे.''[६] यातून त्यांची जीवननिष्ठा दिसून येते.

**जीवन एक संघर्ष :**

या जगात माणसाचे जीवन अनेक सुखदुःखाने भरलेले आहे. जशी माणसाची दृष्टी तसेच त्याला जग दिसते. या जगाने माणसाला भरपूर प्रमाणात दुःख दिले तरी हे जग, ही सृष्टी 'हासरी ' आहे. अशी त्यांची श्रद्धा आहे म्हणून एका कवितेत म्हणतात-

''हासरे जग आसवांनी पाहणे नाही बरे
सौख्यदायी वेदनेला टाळणे नाही बरे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७)

परंतु त्याही पेक्षा 'जीवन' (पृ. ३२) या कवितेत जगणे कसे असावे हे त्यांनी फार सुंदर रीतीने रेखाटले आहे. 'जन्म आणि मृत्यू यातील कालमर्यादा म्हणजे जीवन नव्हे,' कोणतीही अपेक्षा न ठेवता आनंदपणाने, त्यागीपणाने जगणे म्हणजे जीवन होय, असे त्यांना वाटते म्हणून जीवनाची व्याख्या करताना त्यांनी म्हटले आहे -

''फुलणे, जळणे, जग उजळणे
फासावर जाणे बलिदान करणे
हाच ज्यांचा धर्म आहे
हेच जीवनाचे मर्म आहे
जगत जगवीत सुगंध देणे
वेडाने झपाटून ध्येय धुंद होणे
याचसाठी करायचे हवन
जगाला द्यायचे संजीवन
याचेच नाव जीवन
याचेच नाव जीवन ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३३)

जे जीवन जगायचे, उपभोगायचे ते माणुसकीनेच अनुभवले पाहिजे, जगले पाहिजे; नीतिमत्तेने, उदात्ततेने, त्यागाने जगले पाहिजे असा एक विचार 'मी हिमालयाचा कडा' (पृ. ३९) या कवितेतून व्यक्त केला आहे. हिमालय माणसाला नीतिमत्तेचा संदेश सांगताना म्हणतो -

''दुनिया ही तर घडीभराची
माणुसकीने जगावयाची
नसे मालकी इथे कुणाची
न छोटा इथे कुणी ना बडा
माणसा, तुला शिकवितो धडा''(सावळ्या विठ्ठला, पृ. ३९)

माणसाने क्रूर पशुसारखे न बनता माणसासारखेच वागावे आणि आपले कर्तृत्वपालन करावे म्हणून हिमालयाच्या द्वारे ते सांगतात -

''नाही सांगत संत व्हायला
नाही सांगत देव व्हायला
एक सांगतो अंती तुजला
फक्त तू माणूस हो तेवढा
माणसा हाच शीक रे धडा '' (सावळ्या विठ्ठला,पुष्ठ ३९)

**आशेचे गीत गाणारा कवी :**

एका कवितेत मात्र जीवनाविषयी त्याचा सूर वेगळा आहे. या जगात खऱ्या अर्थाने आपण एकटे असतो. आपले कुणाशीही नाते नसते. नाते असते ते एका परमेश्वराशी म्हणून 'नाते' (पृ. ८२) या कवितेत 'जगाशी काय कुणाचे नाते?' असा प्रश्न उपस्थित करतात. हा संसार मायेचा खेळ आहे आणि आपण त्या परमेश्वराच्या हातातील बाहुले असतो म्हणून ते म्हणातात -

''तोच हसवितो तेव्हा हसशी
तोच रडवितो तेव्हा रडशी
तुझे तुझाशी तरी माणसा असतें का रे नाते?
जगाशी काय कुणाचे नाते ?'' (सावळ्या विठ्ठला, (पृ.८२)

अशीच भावना 'कुठून आलो कुठे जायचे?' (पृ.३८) या कवितेत व्यक्त केली आहे. जगताना माणसे किळसवाणे आणि खोटारडेपणाने का वागतात? भलेपणाची चाड का सोडतात. बायकां मुलांचा मोह का ठेवतात? असे प्रश्न कवीला पडतात. हे सगळे नष्ट होऊन शेवटी मातीचे धन व्हावे लागते म्हणून ते म्हणतात -

''काळ यमाची पकड बैसता निमुटपणाने जाणे
माझे माझे म्हणत शेवटी मातीचे धन होणे.'' (सा.वि.,पृ.३८)

या दोन तीन कवितातील आशयामध्ये काही प्रमाणात निराशेचा सूर उमटलेला आहे असे वाटते. म्हणून कवीचा दृष्टीकोन निराशावादी आहे असे म्हणता येणार नाही. कारण कवी जीवनाबद्दल कोणतीही तक्रार करीत नाही तर जीवन क्षणभंगूर आहे हे चिरंतन सत्य सांगतो आहे. जीवन जगायचे पण त्यातील सुखदु:खापासून अलिप्त राहायचे. असा काहीसा दृष्टीकोन त्यातून प्रकट झाला आहे. त्यामुळे 'कोंबडा' (पृ. २५) या कवितेतील विचार महत्वाचा ठरतो. त्यांची ही गाजलेली कविता आहे. रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर एका पेटाऱ्यात पॉर्सल करण्यासाठी कोंबड्या आणि कोंबडे भरलेले होते. हे सारे कत्तल खाण्याकडे मृत्यूच्या मार्गाने चालले होते. अशावेळी पहाट होताच एका कोंबड्याने कुकूचं कू!SS अशी बाग दिली ती ऐकताच कवीच्या मनात आलेले विचार जीवन आणि मृत्यूवरील एक सुंदर भाष्य आहे ते म्हणतात -

''घटकाभरांत नानेवरती फिरणार आहे ज्याची सुरी
त्याच निर्दयी माणसाला कोंबडा अजुन जागे करी'' (सावळ्या विठ्ठला, पृ. २७)
...
''मला वाटते, कोंबडा काही अजाण राहून आरवत नाही
मला वाटते, कोंबडा आपल्या मरणालाही घाबरत नाही
मला वाटले, माणसाला तो शिकवीत आहे नवीन कांही
बुद्धिजीवी माणसाला तो कोंबडा सांगतो असंच काही
'मृत्यू समोर दिसला म्हणून कर्तव्याला विसरुं कसा?
माणसां तूं रे या वचनाचा हृदयावरती ठेव ठसा!'' (सावळ्या विठ्ठला, पृ. २७)

यातून त्यांची जीवनविषयक दृष्टी स्पष्ट होते.

**जीवनाचे शिल्प :**

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे त्यांचे जीवनावर प्रेम आहे. त्या दृष्टीने त्यांनी मृत्यूपुर्वी लिहिलेली 'जीवनाचे शिल्प' (पृ. ८) ही एक सुंदर कविता आहे व ती अर्थपूर्ण आहे. जीवनाशी समरस होऊन मृत्यूच्या उंबरड्यावरून कवी त्याकडे अलिप्तपणे पाहतो, आणि म्हणतो -

''जीवनाचे शिल्प माझे आज अपुरे राहिले
शक्य झाले तेवढे मी कोरले अन् पाहिले.'' (सावळ्या विठ्ठला, पृ.०८)
...
''जीवनाचा श्रेष्ठतम शृंगार मृत्यू हा सखा

का करंटा होऊनी भेटीस होऊ पारखा?
स्वागतासाठी कवाडे सर्व उघडी ठेवितो
येई मृत्यो ये सख्या तुज मी उराउरि भेटतो.''        (सा. वि., पृ.०८)

'जीवनाचे शिल्प' अपुरे राहिल्याची कवीला खंत वाटत नाही कारण त्यांच्या शब्दात -

''साधकांनी पूर्णतेचे स्वप्न केवळ पाहिले -
साधनेच्या पूर्णतेचे भाग्य कोणा लाभले?
आणि कानोसा मनाचा माझिया मी घेतला
शब्द आले पूर्णतेचा लाभ कोणा जाहला?
शल्य पूर्णापूर्णतेचे वाटू द्या जरि वाटते
पूर्ण होता शिल्प त्यातिल काव्य पुरते संपते.''    (सा. वि., पृ. ०८)

या ओळीतून कवीची अंर्तमुखतेतून आलेली अलिप्तता जाणविते. चिंतनशीलतेचा प्रत्यय येतो आणि म्हणूनच कवीचे शेवटचे उद्गार अर्थपूर्ण वाटतात. तो म्हणतो -

''या कलानंदातले हे मर्म मजला उमगले
मी पुन्हा म्हणणार नाही, 'शिल्प अपुरे राहिले!''  (सा. वि., पृ. ०८)

कवीचे जीवनावर प्रेम आहे. ते जाणण्यासारखे आहे. आपण आपल्या परीने जीवनाचे शिल्प उभे करावे आणि वेळ येताच निघून जावे. त्याची खंत का करावी? असा एक जो विचार मांडला आहे, ते जीवनावरचे एक सुंदर भाष्य आहे.

**जीवनवादी कवी :**

रा. ना. पवारांची जीवनविषयक कविता त्यांचे जीवनानुभव, त्यांचे व्यक्तित्व आणि त्याची एकंदर कविता या दृष्टीने महत्वाची आहे. कारण इंग्रजी साहित्यांच्या आधारे साहित्यसमीक्षेचा अभ्यास करणारा W.H. Hudson याने म्हटले आहे, ''A Great book is born of the brain and heart of its author; he has put himself into its pages; they partake of his life and are instinct with his individuality.[७]

अगदी असाच विचार रा. ना. पवारांच्या संदर्भात डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी मांडला आहे. त्यांनी म्हटले आहे, ''या कवीने अनेक प्रकारचे भलेबुरे अनुभव आपल्या आयुष्यातून गोळा केलेले आहेत. पदरात साचलेल्या अनुभवाकडे दृष्टी टाकली तर त्यात दु:ख, वैफल्य, अगतिकता

यांची भर विशेष दिसते. जबाबदाऱ्या अधिक, कुचंबना अधिक, कुणालाही अश्रद्धेने भीतीने घेरुन टाकावे अशाच गोष्टी यात भरपूर आहेत पण आश्चर्याची गोष्ट अशी की, पवारांच्या कवितेने सतत आशेची, आव्हानाची आणि पराक्रमाची गाणी गायिली आहेत. त्यांच्या शब्दांतून श्रद्धा आणि विश्वास यांचेच दर्शन घडते. आयुष्य जगण्यासाठी आहे, दुःखाचे ढीग उपसताना आपण सुखाची गाणे गाऊन आपल्या भोवतालच्या जगाचे मन आनंदित केले पाहिजे असा सूर त्यांच्या साहित्यातून निघतो.''[८] या विधानाचा प्रत्यय त्यांच्या जीवनविषयक कवितेतून येतो. यांचा अर्थ त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा अर्थ आशावादी आहे.

**भक्तिविषयक कविता :**

कवी रा. ना. पवार यांच्या मनामध्ये बालपणापासून भक्तिचे संस्कार झाले आहेत. त्यांनी आठवण सांगितल्याप्रमाणे, ''संगीत आधी की काव्य आधी हा वाद अद्यापही अनिर्णीत असला तरी मी मात्र संगीताच्या आकर्षणामुळे काव्याकडे ओढला गेलो. लहानपणापासून देवळातून होणाऱ्या भजनात टाळ वाजविणे व भजन, गौळण म्हणणे हा आवडता छंद मला जडला होता.''[९] तशी त्यांची मुळातच श्रद्धाशील प्रवृत्ती आहे. साधुसंत देशातील महानव्यक्ती यांच्याविषयी श्रद्धाभावना व आदरभावना किती उत्कट आहे हे त्यांनी लिहिलेल्या गौरवगीतांच्या संदर्भात केलेल्या चर्चेत (पृ.    )दिसून येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे रा. ना. पवारांचे नाव संबंध महाराष्ट्रातच नव्हे तर अमेरिकेतही गाजले ते त्यांच्या 'सावळ्या विठ्ठला' या त्यांनी लिहिलेल्या आणि मराठीतील गायिका सुमन कल्याणपुरांनी गायिलेल्या भक्तिगीतामुळे. इतकेच नव्हे तर वीस भक्तिगीतांच्या रेकॉर्डस् निघाल्या व गाजल्या. पु. ल. देशपांडे, ज्योत्स्ना भोळे, सुमन कल्याणपूर, माणिक वर्मा, दशरथ पुजारी यांनी त्यांच्या गीतांचे मनपूर्वक कौतुक केले. हे कौतुक म्हणजे रा. ना.पवारांच्या भक्तिगीतांना मान्यवरांकडून मिळालेली ही पावती होय. म्हणून त्यांच्या काव्यामध्ये भक्तिगीतांचे महत्वाचे स्थान आहे.

**सगुण भक्ती :**

कवी रा. ना. पवार यांच्या मनात भक्तिभावना असली तरी सांप्रदायिक किंवा विशिष्ट मताची नाही. मानवी जीवनाचे आणि या साऱ्या सृष्टीचे सूत्र हलविणे. परमेश्वर हा निर्गुण निराकार आहे. परंतु सामान्य जनांसाठी तो सगुण रुपात अवतरतो. निर्गुण आणि सगुण ही त्यांची दोन्ही रुपे सारखीच आहेत. तो परमेश्वर साऱ्या सृष्टीत अव्यक्तरुपात आहे; परंतु साध्या भोळ्या लोकांसाठी त्यांनी व्यक्तरुप धारण केले आहे. ही त्यांची दोन्ही रुपे परस्परविरोधी नसून एकसारखीच आहेत. त्यामुळे योगमार्गाने जाणाऱ्यांना जशी परमेश्वराची प्राप्ती होते, दर्शन घडते त्याचप्रमाणे केवळ

भक्तिभावनेने उपासना करणाऱ्या सामान्यजनांनाही त्यांची प्राप्ती होते. कवी याच परिभाषेमध्ये 'नका विचारु देव कसा' (पृ.२) या कवितेत म्हणतो -

''नका विचारु देव कसा
देव असे हो भाव तसा ॥
सगुण कुणी म्हणती देवाला
कोणी म्हणती निर्गुण त्याला
विश्वरुप त्या परमेशाचा
चराचरावर असे ठसा ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२)

या संदर्भात त्यांनी निसर्गातील सुंदर उदाहरण दिलेले आहेत. फुलाचा रंग डोळ्याला दिसतो पण गंध दिसतो का? फुलाचा रंग हे सगुणरुप तर फुलाचा गंध त्याचे निर्गुणरुप आहे. ज्यांच्या त्यांच्या भक्तिभावनेप्रमाणे भक्तांना परमेश्वराचे रुप दिसते. म्हणून त्यांनी म्हटले आहे -

''साक्षात्कार जसा तो दाखवी
दिसेल त्याला प्रभू तसा ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२)

तशी ही कविता साधीच आहे पण अर्थपूर्ण आहे. पण इतर काही कविता पहाता असे वाटते की, या कवीला देवाचे सगुणरुप अधिक आवडते. वारकऱ्याची श्रद्धा भावना आणि सगुणभक्ती याचा सुंदर आविष्कार त्यांच्या जगभर गाजलेल्या 'सावळ्या विठ्ठला' (पृ.१) या भक्तिगीतातून झाला आहे. भक्तिच्या भावनेने त्यांचे अंत:करण म्हणते -

''सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले
विसरुन गेले देहभान ॥
गोजिरे हे रुप पाहुनिया डोळां
दाटला उमाळा अंतरी माझ्या ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.१)

या सगुणरुपी देवाने विठ्ठलाच्या रूपात अनेकांचा उद्धार केला म्हणून कवीचे मनही म्हणते-

''जगी कितीकांना तारिलेसे देवा
स्वीकारी ही सेवा आता माझी।'' (सा. वि.पृ. १)

सगुणरुपात असलेल्या विठ्ठलाने आपल्याला दर्शन द्यावे आपल्यावर कृपावृष्टी करावी अशी कवीच्या मनात अत्यंतिक तळमळ आहे. त्या तळमळीचे आर्त गाणे म्हणजे 'क्षणभर उघड नयन देवा!' (पृ.



13520
A

३) ही कविता होय. त्या प्रिय देवाची मंगल पूजा करण्यासाठी कवीची भक्तिभावना मंगलपूजा करते. 'देहदीप' जाळते आणि भावभक्तिचा नजराना स्वीकारण्याची विनंती करते. कवी इतर भक्तांप्रमाणे स्वत:लाही साधा सामान्य समजतो आणि आर्ततेने म्हणतो -

''अभंग नाही, नाही ओवी
मूक जीवाने कशी रे गावी?
नयनामधले अश्रू करिती
अखेरचा धावा ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३)

कवीच्या मनातील भक्तिभावना अधिकच धीट होते आणि ती म्हणते, केवळ परमेश्वराने कृपादृष्टी करुन चालणार नाही तर त्याने आता बोलले पाहिजे म्हणून 'देवा बोला हो माझ्याशी' (पृ.४) या कवितेत ती भावना आर्ततेने म्हणते -

''देवा बोला हो माझ्याशी
तुम्हीच मजवर रुसल्यावरती
बोलू मी कोणाशी ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.४)

मग ती भावना अधिक धिटाईने म्हणते -

''तुम्ही मजला बोल शिकविले
आज मौन कां तुम्ही धरले
बोल शिकवूनी माय अबोला
धरिते कां पिलाशी?'' (सावळ्या विठ्ठला, पृ.४)

त्या देवाला बोलायचे नसेल तर राहू दे, त्यांने आपल्या कमलाक्षातून अविनाशी कटाक्ष फेकावा तरी आपण धन्य होवू असे त्यांच्या भक्तिभावनेला वाटते. याच भक्तिभावनेतून नामस्मरणाचा विचार 'भेटतील श्रीराम' (पृ.५) या कवितेत मांडला आहे.

**नामभक्ती :**

भक्तिसंप्रदायावर नामस्मरणाचे फार महत्व आहे. शुद्ध अंत:करणाने परमेश्वराचे नामस्मरण केले तर परमेश्वर प्रसन्न होतो आणि भक्तांची सुखदु:खाच्या फेऱ्यातून मुक्तता करतो असा एक सिद्धांत आहे, म्हणून असे आढळून आले की, भारतातील सर्व भक्तिसंप्रदायाने नामस्मरणाचा गौरव केला आहे, सोलापूर जवळ असलेल्या पंढरपुरातील भागवत संप्रदाय रा.ना.

पवारांच्या मनावर या 'नामभक्ती' चे संस्कार झाले आहेत. त्यांनी कवितेत नाम महिमा सांगितला आहे ते भक्तिभावनेने म्हणतात -

''मला न कांही दुसरे ठाऊक एक जाणतो राम
संतपदावर ठेवुनी माथा गाईन प्रभुचे नाम ॥'' (सा. वि., पृ. ५)

या ठिकाणी त्यांनी प्रभू रामचंद्राचे म्हणजे साक्षात परमेश्वराचे नामस्मरण केले आहे. या नामस्मरणामुळे आपली भवसागरातून मुक्तता होईल म्हणून ते म्हणतात -

''चौऱ्यांशीचे चुकतील फेरे भेटतील रीराम
संतपदावर ठेवुनी माथा गाईन प्रभूचे नाम ॥'' (सा. वि.पृ. ५)

म्हणूनच 'लक्ष्मणा डोळे पूस तूझे' (पृ.६) या कवितेतील सीताई म्हणजे कर्तृत्वासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या रामाच्या स्मरणाने, गुणवर्णनाने, वनात सुद्धा सुखाने राहिली. तिने आपल्या मनातच श्रीरामाला सामावून घेतली आहे म्हणून ती म्हणते -

''दु:ख जाहले तनू मनाला
सौख्यच गमते ते साध्वीला
गुण संकिर्तने करतील रविराशि प्रभू श्रीरामाचे'' (सा. वि, पृ. ६)

**इतर भक्तिंभावना:**

कवीच्या मनात आस्तिक भावना आहे. परमेश्वरावर श्रद्धा आहे. त्यामुळे इतर विषयावरच्या काही कवितातूनही भक्तिभाव व्यक्त झाला आहे. 'देव' (पृ.३५) या कवितेत कुणी श्रीमंत मनुष्य म्हणतो -

''मस्तीत मी म्हणालो दुनियेत देव नाही
पैशासमान दुसरी दुनियेत ठेव नाही ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३५)

संपत्तीच्या जोरावर आपण सर्व सुखे मिळवू शकतो याचा त्याला अहंकार होतो; परंतु काही दिवसांनी त्याचे डोळे गेले. अनेक उपचार करुनही डोळ्यामध्ये नजर आली नाही, त्यावेळी मात्र त्यांच्या आंधळ्या डोळ्याला (की आंधळ्या मनाला) देव दिसला म्हणून देव नाही म्हणणारा तो श्रीमंत म्हणतो -

''उन्मत्त डोळसाला नाहीच देव दिसला
लाचार आंधळ्याला स्वप्नांत देव दिसला

आता कसे म्हणूं मी दुनियेत देव नाही.''     (सा. वि.,पृ.३६)

...

''कोणी म्हणू नका हो दुनियेत देव नाही
देवा समान दुसरी दुनियेत ठेव नाही ॥''     (सा. वि, पृ. ३६)

परमेश्वर हा सर्व चराचा असल्याने त्याची भक्ती करुन, त्याची जाणीव ठेवून कवीला सामर्थ्य मिळते. याच भक्तिच्या मार्गाने ज्ञानेश्वराने सामर्थ्य मिळविले व समाजाचा उद्धार केला. ('ज्ञानियांचा राजा' पृ. ७४) तर समर्थ रामदासांनी महाराष्ट्र राष्ट्राचा उद्धार केला. (समर्थ रामदास स्मृती, पृ. ७५) असे त्यांना वाटते.

**सोलापूर संताचा महिमा :**

सोलापूरचा अभिमान सांगताना येथील इतिहासापेक्षा दैव-दैवतांचा वास आणि साधू-संतांचा सहवास यामुळे ही भूमी पवित्र झाली, असे त्यांना वाटते. 'पांडुरंग', 'भगवंत', 'रुपाभवानी', 'सिद्धेश्वर', 'कवि शुभराय' यांमुळे सोलापूर शहराला वैभव प्राप्त झाल्याने ते अभिमानाने म्हणतात-

''सोलापूर हे शहर आमुचे आहे भाग्याचे
इथे कुणाला दिवस न येतील कधी अभाग्याचे ''     (सा. वि. ,पृ. ८७)

याच सोलापूरच्या परिसरातील पंढरपुराला ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम यांचा सहवास लाभल्याने कवीला या भूमित ब्रह्मरुप प्रकटले आणि या श्रेष्ठ संताच्या दर्शनाने आपण धन्य झालो. इतके की-

''नाही मज भीती जन्म मरणाची
संत दर्शनाची कृपा होता।''     (सा. वि.,पृ. ८८)

एवढी धन्यता त्यांना वाटते.

**उत्कट भक्तिभावना :**

या सर्व भक्तिगीतांवरुन रा. ना. पवारांच्या मनात परमेश्वराविषयी असणारा आस्तिक भाव साधुसंताविषयी असणारा आदरभाव त्यांनी उत्कट स्वरूपात व्यक्त झाला आहे. त्यांची भक्तिगीते अत्यंत साधी सोपी असली तरी त्यातील भक्तिभावना कमालीची उत्कट आहे. याचा प्रत्यय लाखो रसिकांना आलेला आहे. या संदर्भात संतसाहित्याचे अभ्यासक डॉ.निर्मलकुमार फडकुले, यांचे विधान महत्वपूर्ण वाटते, ''त्यांनी म्हटले आहे, 'सावळ्या विठ्ठला' हे सुमन कल्याणपूर या गायिकेने गायिलेले भावगीत मी प्रथम ऐकले तेव्हा मुग्ध झालो ते त्यांच्या सुलभ शब्दरचनेने या गीतातल्या प्रत्येक शब्दाला

जो नीटस् आकार आणि रेशमी स्पर्श आहे तो खरोखरच मोठा लोभनीय वाटतो. विठ्ठलाचे सावळे रूप एखाद्या नास्तिकाच्याही मनात उमटविण्याची किमया रा. ना. पवारांच्या या कवितेने किती सहजपणे केले याचे आश्चर्य वाटते.''[१०]

त्यांच्या भक्तिकाव्यामध्ये हे सामर्थ्य निर्माण झाले ते केवळ रचना सौंदर्यामुळे नाही म्हणून निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहे, ''ईश्वराच्या सर्व व्यापकतेच्या आणि सर्व स्पर्शित्वाचा प्रत्यय आल्याशिवाय उत्तम भक्तिकाव्य निर्माण होऊ शकणार नाही..... ईश्वर हा त्यांच्या चिंतनाचा एक विषय होता या जगाच्या मुळाशी ईश्वर नावाची एक अलौकीक शक्ती असून साऱ्या जगाची सूत्रे तिच्या हातात सामावले आहे. त्याशिवाय इतकी नियमबद्धता जगात असणे शक्यच नाही, असे ते नेहमी म्हणत ईश्वरविषयक चिंतनात कधी कधी केवळ भाविकांनाच शोभतील असे प्रगाढ श्रद्धेचे उद्‌गार त्यांच्या तोंडून ऐकले. या रुजलेल्या श्रद्धेतून उचंबळून आलेल्या काही कवितांमध्ये त्यांची भक्तिगीते आहेत.''[११]

**कौटुंबिक कविता :**

रा. ना. पवारांचे कौटुंबिक जीवनावर उत्कट प्रेम होते. आई, वडिल, पत्नी, मुले, मित्र यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार आदर होता. आपल्या कुटुंबावर जसे प्रेम केले, तसे आपल्या मित्रपरिवारांवर व समाजातील दीन-दलितांवर प्रेम केले. म्हणून दै.संचार, सोलापूरचे संपादक रंगा वैद्य यांनी योग्य शब्दांत वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''मृत्यू जीवनाच्या प्रवेशद्वारात ठोठावत असताना रा. ना. पवारसारख्या आनंदी यात्रिकाने शारिरीक असह्य वेदना सहन करित मैत्रिची संवेदनशीलता कौटुंबिक जिव्हाळ्याने तेवत ठेवली आहे. कुटुंब, समाजमैत्री व मानवाच्या संवर्धनासाठी त्यांनी आपल्या जीवनाची सार्थकता मोठ्या मनानी सिद्ध करुन दारवविली आहे.''१२ या विधानाचा प्रत्यय रा. ना. पवारांनी लिहिलेल्या कौटुंबिक जीवनावरील कवितावरून दिसून येतो.

**पातिव्रत्य :**

'पातीव्रत्य' हा भारतीय संस्कृतीचा एक महनीय विशेष आहे. 'लक्ष्मणा डोळे पूस तुझे' (पृ. ६) आणि 'दूर वाटेवरी' (पृ. ८३) या कवितेत पातीव्रत्याचे चित्रण आले. वनवासाला जाताना लक्ष्मणाला अत्यंत दु:ख वाटते, तेव्हा सीता लक्ष्मणाला सांगते, 'की तू दु:ख मानू नकोस, राम माझा पती असला तरी तो प्रजेचा राजा आहे, 'प्रजाजनाचा कौल मानती तेच श्रेष्ठ राजे' असा श्रेष्ठ राजा माझा 'आत्माराम' असल्याने त्यांच्या मार्गावरुन जाणे माझे कर्तव्य आहे. स्वत:च्या सुखदु:खाला विसरून पतिसाठी त्याग करणे हे तिला योग्य वाटते, म्हणून ती म्हणते-

''दु:ख जाहले तनू मनाला
सौख्यच गमते ते साध्वीला
गुण संकिर्तने करतील रविशशि प्रभू श्रीरामाचे
लक्ष्मणा डोळे पूस तुझे।'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ६)

त्यागातून 'पातीव्रत्य' सिद्ध होते असे या कवितेतून दाखविले आहे; परंतु त्यापेक्षा 'दूर वाटेवरी' (पृ. ८३) या कवितेतील पतिव्रत्येचे चित्रण अधिक उत्कट आले आहे. या कवितेतील स्त्रीला माहेरचे बोलावणे आले आहे, माहेरी जाण्यास ती इच्छुकही आहे; परंतु माहेराएवढेच तिचे मन सासरीही गुंतले आहे. 'आपल्या प्रिय पतीला सोडून माहेरी जाणे. तिच्या जीवावर आले आहे, म्हणून ती म्हणते -

''सोडूनी का याना जाऊ माहेराला?
एकट्या जीवाला साथी कोण?'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८३)

पती तिची समजूत घालतो म्हणून ती जायायला तयार होते, तरीही तिच्या मनाची घालमेल संपत नाही, कारण -

''वाट पाहे माझे मायेचे माहेर
सुखाचे सासर सोडवेना॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८४)

तिची ही अवस्था बघून तिला बोलवायला आलेला भाऊ परत जातो.

**कर्तव्य परायणता :**

पत्नीप्रमाणे पतीही त्याग करतो याचे चित्रण 'अखेरचे पत्र' (पृ. ४१) या कवितेत आले आहे. या कवितेतील सैनिकाला आपल्या बायकां-मुलांना भेटण्यासाठी जायायचे आहे; परंतु राष्ट्रकर्तृत्वासाठी त्याला जाणे शक्य नाही म्हणून तो पत्नीची समजूत घालताना मनात म्हणतो-

''सुजाण तू कळे तुजला स्वदेश प्रेम चांगले
स्वदेश मुक्तिचे इथे समूर्त स्वप्न रंगले
म्हणू नकोस तू प्रिये अपूर्ण स्वप्न भंगले॥'' (सा. वि. पृ.४१)

अशीच कर्तव्य परायणता 'सोनं झालंया स्वस्त' (पृ. ५२) या कवितेत चित्रित केली आहे. पण ही कर्तव्यपरायणता पत्नीची आहे. युद्धाच्या वेळेला सोनं स्वस्त झालंय म्हणून घेण्यासाठी पत्नी हट्ट करते. आतापर्यन्त पतीने लंकेच्या पार्वतीसारखे ठेवले म्हणून सोनं स्वस्त झाल्यानंतर सोनं

घेण्यासंबंधीचा ती आग्रह करते, तेव्हा पती आजच्या युद्धकाळात देशाला खरी सोन्याची गरज आहे हे तिला पटवून देतो. तेव्हा मात्र ती आपली सोन्याची इच्छा बाजूला सारुन त्याला युद्धावर जायायला प्रवृत्त करते. त्यावेळी ती म्हणते -

''सोनं झालया स्वस्त कारभारी सोनं झालया स्वस्त
विजयी होऊनी याल तुम्ही मग अजुन होईल स्वस्त'' (सा. वि.पृ. ७३)

**अवखळ शृंगार :**

'आज नाहीच कां बोलायचे?' (पृ. ६५) या कवितेत पती-पत्नीमधील शृंगाराचे अवखळ चित्रण केले आहे. त्यांचे जेवण झाल्यानंतर त्याला आवडते म्हणून ती विडा घेऊन जाते. कधी सासूबाईची कधी सासऱ्याची अडचण येते. त्यांच्यासमोर विडा, चहा देणे तिला योग्य वाटत नाही म्हणून ती एकदा एकांत मिळाल्यानतर ती विडा द्यायला जाते पण कोणी तरी पाहिल म्हणून दरवाजा लावण्याचे तीच्या पतीला कसे सूचत नाही. याचे तिला आश्चर्य वाटते -

''गडे दार तरी लावायचं?
आज नाहींच कां बोलायचं? ॥'' (सा. वि.,पृ. ६५)

एकत्रित कुटुंबपद्धतीत पती-पत्नीच्या मनाची कशी कुचंबना होते हे दिसून येते.

**कौटुंबिक वात्सल्यचित्रण :**

काही कवितांमधून त्यांनी शहरी जीवनाचे कौटुंबिक चित्रण केले आहे. 'मुंबईची चाळ' (पृ. ६७) 'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२९) या दोन कवितातून शहरी भागातील मध्यमवर्गीय व कामगारांचे चित्रण केले आहे. मुंबईसारख्या शहरात चाळीत राहाणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबातील स्थिती आणि प्रवृत्ती याचे प्रत्ययकारी चित्रण आढळते. एका दृष्टीने ते सामाजिक चित्रण आहे. माणसाच्या जीवनातील कृत्रिमता बेशिस्त आणि अवखळपणा त्यांनी मजेशीररित्या दाखविला आहे. तर 'आज भोंगा वाजत आहे' (पृ. २९) या कवितेत गिरणी बंद पडल्याने कामगारांचे कौटुंबिक जीवन कसे उध्वस्त होते याचे दर्दभरी चित्रण केले आहे. आजच्या या यंत्रप्रधान व अर्थप्रधान शहरी संस्कृतीमध्ये काय घडेल हे सांगताना कवी म्हणतो -

''माणसाला माणूस आज माणसातून उठवीत आहे
दया, क्षमा, शांती यांचे लटके पाठ घटवीत आहे.'' (सा.वि.पृ. ३१)

**वात्सल्यप्रेम :**

काही कवितांतून कवीने वात्सल्याचे चित्रण केले आहे. त्यामध्ये 'हरिणी आणि पाडस' (पृ.४९) ही कविता भावपूर्ण आहे. एक हरिणी आपल्या पाडसाचे जीवापाड संरक्षण करते पण एकेदिवशी त्या हरिणीची हत्या होते आणि बिचारे पाडस एकटेच राहते. उघड्या डोळ्यांनी ती आपल्या आईची हत्या पाहते पण काहीच करु शकत नाही. अशा प्रसंगाचे या कवितेत कवीने अत्यंत वास्तववादी पण भावपूर्ण चित्रण केले आहे.

'मुलगी दाखवावी म्हणतो.' (पृ.६९) या कवितेत कवी कौटुंबिक जीवनातील एका प्रसंगाच्याआधारे 'जीवनात खरे सौंदर्य साधेपणात असते' कृत्रिम शृंगारात नसते. याचे मजेशीर वर्णन केले आहे. या कवितेतील मुलगी आधुनिक फॅशनची नसून पारंपारिक साध्यावळणाची आहे, तेव्हा ती पसंत पडते का पहा असा एक खवचट प्रश्न कवी विचारतो; परंतु यापेक्षा 'लेकीची लावणी' (पृ.५०) ही कविता अधिक भावपूर्ण व अर्थपूर्ण आहे. कवी संजीव यांनी या लावणीविषयी म्हटले आहे, ''लावण्या शृंगारिक असतात किंवा असाव्यात हा संकेत रा.ना.नी मोडून वात्सल्याने ओथंबलेली लावणी लेकीच्या बापाला सूचल्यास नवल नाही. ही लावणी जितकी सुबक तितकीच शब्दरचनेच्या दृष्टीने लाटानुप्रासावर चाळ बांधून नाचत जाते. तरी ती जिव्हाळ्याचा आशय सोडत नाही.''[१३] तसेच प्रा.चंद्रभूषण कुलश्रेष्ठ या लावणीविषयी म्हणतात, ''लेकीची लावणी' ही त्यांची हृदयस्पर्शी कविता जेव्हा ते स्वत:च्या गळ्यावर गातात, तेव्हा ज्यांना लेक नाही अशा अविवाहितांच्या डोळ्यातूनही पाण्याच्या धारा वाहतात. सासरी लेकीची पाठवणी करणाऱ्या बापाच्या हृदयातील भावना व्यक्त करताना कवी मन हेलावून टाकतो. तर बापाच्या डोळ्यांतील पाणी खळत नाही. जीवनानुभवाने काहीशी रांगडी बनलेली रा.ना.ची कविता या लेकीच्या लावणीत आपले भावूक रूप मनाला भिडवून जाते.[१४]

रा. ना. पवारांच्या कौटुबिक कवितातील एक समर्थ व सुंदर कविता असा उल्लेख 'लेकिच्या लावणीचा' करावा लागेल. मुलगी वयात आली की बापाच्या जीवाला घोर लागतो . कारण -

> ''लाडाची ही पोर, चंद्राची गं कोर, नेईल कुणी चोर
> हिरकणी ही माझी हिरकणी ही
> भोळी ही हरणी झालिया तरणी
> बापाला झोप नाही रातीला
> धाडला सांगावा जांती गोतीला ।।'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५०)

अशा या मुलीचे लग्न ठरते तेंव्हा बापाला लग्न ठरले म्हणून सुख, तर मुलगी दुरावणार म्हणून दु:ख

होते हे सांगताना कवीने संसारावर आणि जीवनावर सुंदर भाष्य केले आहे. कवी म्हणतो -

''लेकीच्या बापा नाही संसार सोपा
हित दुख हाय सुखाच्या संगतीला
ऊण असतया चांदण्या रातीला'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५०)

अशी ही मुलगी सासरी नांदते आणि तिच्या जीवनात एक नवी चाहूल लागते. तिचे कवीने कमालीचे नाट्यपूर्ण चित्रण केले आहे.-

''व्हटात बोलतंय, एकलच हसतंय सुखात नांदतय
समजायच तुमचं लेकरू हो
गोडकडू लागतय आंबट मागतय ढवाळ लागलय
समजायचं तुमच्या मैनेला हो
चंद्राचा मुखडा काळजाचा तुकडा
वटीत खेळवा नातीला
आजा नातीला धरतोय छातीला.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५१)

लेकीच्या पोटी लेक जन्मायला येणार आणि बाप असलेला आजोबा होणार असा विचार मांडण्यात त्यांनी कमालीची नाट्यमयता दाखविली आहे. त्यांचे कौटुंबिक जीवनावर प्रेम आहे. लेकीच्या संदर्भात 'एक संसार चक्र' कसे चालत असते. हे या कवितेत दाखविले आहे. कौटुंबिक जीवनातील एका भावपूर्ण घटनेचे हे एक चित्रण प्रत्ययकारी आहे. रा. ना. पवारांची कौटुंबिक कविता पाहिली की असे दिसून येते, त्यांचे कौटुंबिक जीवनावर प्रेम होते. कौटुंबिक जीवनातील पती-पत्नीचे भावसंबंध, आई व मुलगा यांचे भावसबंध, भाऊ-बहिण यांचे भावसंबंध, संसारीक स्त्रीच्या जीवनात माहेर सासरची असलेली ओढ अशा विविध स्तरांवरुन कवीने कौटुंबिक नात्यातील भावनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रेमकवीता :**

कवी रा. ना. पवारांनी प्रेम व शृंगार या विषयावरही कविता लिहिली आहे. प्रेम ही एक सार्वत्रिक व मुलभूत भावना आहे. त्यामुळे प्रेमभावना कोणत्याही कवीच्या कवितेचा विषय होणे स्वाभाविक आहे. रा. ना. पवारांच्या मनावर शाहिरी कविता परंपरेचा मुकुटमणी असलेल्या रामजोशींचा प्रभाव असल्याने आणि रामजोशी हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांच्या प्रेमकविता लावणी ढंगाच्या उतरल्या आहेत.

**पती-पत्नीचे निर्व्याज प्रेम**

काही प्रेमकवितातून त्यांनी संसारिक जीवनातील पती-पत्नीच्या कौटुंबिक व सात्विक प्रेमाचे चित्रण केले आहे. 'आज नाहीच का बोलायचे?' (पृ.६५) या कवितेतील पती हा पत्नीवर आपल्याला एकांतात भेटत नाही म्हणून रागावला आहे. रुसणे, फुगणे, हसणे ही तर प्रीतीचे गाणे गाण्याच्या तऱ्हा आहेत. पत्नी त्याला एकांतात भेटण्याचा प्रयत्न करते पण भरल्या घरात सासू-सासरे असल्याने भेटण्याची संधी मिळत नाही. मात्र एकदा हवा तसा एकांत मिळाला तेव्हा मात्र ती विडा घेऊन जाते आणि रागावलेल्या पतीला म्हणते -

''आता कुणीही नाही घरात
मिळे क्षणाचा हा एकांत
विडा आणला मी ओठात
गडे! दार तरी लावयचं?
आज नाहीच का बोलायचं?'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७१)

यातील नर्म शृंगार भावपूर्ण आहे तर 'सोबत जन्माची' (पृ. ७१) मध्ये पती-पत्नीतील ऐक्याचे कल्पनाविलासात्मक चित्रण आढळते. आपल्या मनात सतत पती आणि पतीचे प्रेम असते हे सांगताना ती म्हणते -

'विहरे सुधांशु निळ्या मंदिरात
मनो मंदिरात तूच माझ्या ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७१)
...
''चंद्रासवे एक चांदणी शुक्राची
सोबत जन्माची तुझी माझी ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.७१)

तिचे पतीवर उत्कट प्रेम आहे. म्हणूनच त्याला सोडून माहेरी जाण्यास तिचे मन तयार होत नाही. तसेच तिला माहेरची आठवण येते व ओढ ही लागते म्हणून पती तिची समजूत काढून माहेरी जाण्यास सुचवितो त्यांचे तिच्यावर उत्कट प्रेम आहे म्हणून तो म्हणतो -

''तुझ्या संगतीत अंकुरली प्रीत
आणि विरहात बहरेल ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ.८४)

तरीही सासरहून तिचा पाय निघत नाही -

''उचलेना पाय इथून निघाया
मंतरली काया माझी कोण?'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८४)

'दूर वाटेवरी' (पृ.८३) या नाट्यगीतातील पती-पत्नीचा संवाद दोघांच्या अंतःकरणातील उत्कट प्रीतिचा आविष्कार करतो.

**प्रेमिकांचा शालीन शृंगार :**

इतर काही कवितांतून मात्र त्यांनी वस्तुनिष्ठ भूमिकेवरुन प्रेमिकांच्या भावनांचा आविष्कार केला आहे. या कवितांमध्ये उत्कट प्रीतितून निर्माण झालेल्या शृंगारीक भावनांचे कवीने संयमीत चित्रण केले आहे. 'रुप तुझं डोळ्यांत' (पृ.५४) या कवितेतील स्त्रीच्या मनात प्रियकराचे सौंदर्य ओतप्रोत भरले आहे. त्यांच्या आकर्षणाने ती रानात भेटायला जाते तेव्हा तो तिला मोहात पाडण्याचा प्रयत्न करतो म्हणून ती म्हणते -

''रुप तुझं डोळ्यांत, नाव तुझं ओठांत,
ध्यास तुझा मनांत मी घेतला
दूर अशी मळयांत, सापडले जाळ्यांत
डाव नवा रानात, तू टाकिला ॥'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५४)

पण ह्यामुळे चार चौघात बोभाटा होईल म्हणून ती त्याला विनंती करते -

''राया मी नाजूक नार,
वार तुझ्या नजरेचा जाई आरपार
भीतीने जीव माझा व्याकुळला
तुझ्या माझ्या मनांत, प्रेम नाचे तालांत
बोभाटा जनांत, माझा झाला!'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५४)

दुसऱ्या एका कवितेत मात्र त्यांच्या मीलनाचे वर्णन केले आहे. 'स्वर्ग-सुखाचे दोनच क्षण' (पृ.५५) या कवितेत प्रियकराच्या मनात प्रेयसीचे सौंदर्य भरले आहे. तिच्या नजरेने, त्या नजरेतील सूचक प्रेमभावाने तो घायाळ झाला आहे. तिच्या नजरेच्या तीराने त्याची पारध केली आहे. म्हणून तो म्हणतो-

''कसा दिसावा मला तुझा हा तीर लोचनांत
अवचित मी ही सापडलो गे तुझीया जाळ्यांत''(सावळ्या विठ्ठला, पृ.५५)

आतापर्यन्त त्याला तिच्या नजरेत दाहकता दिसत होती; परंतु मीलनामुळे त्याला शीतलतेचा प्रत्यय येतो. मीलनाच्या त्या एका क्षणाने तिच्या प्रेमाची साक्ष पटते आणि त्याचे सारे जीवन बहरुन जाते. प्रेमातील शृंगारामुळे जीवनात होणाऱ्या बदलाचे वर्णन या कवितेत कमालीच्या संयमाने चित्रीत केले आहे. तो म्हणतो -

''तव नयनीच्या तीरांमधली सरली दाहकता
त्यांत साठली चांदरातिची मादक शीतलता
तव ओठातून अमृतधारा झरति अखंडीत
प्राशुनिया मनमोर जाहला दंग नर्तनांत
तव नेत्रीच्या त्रिलिम्यांत मी विसरतो जगास
तुझ्या संगतीत तुच्छ मानतो स्वर्गिच्या सुखास
स्वर्ग-सुखाचे दोनच क्षण ते येतां हातांत
उदासीनता युगायुगांची सरते निमिषांत।'' (सावळ्या विठ्ठला, पृ.५५)

असेच एक चित्रण 'आज पुनवेची रात'(पृ.५८) या कवितेत आढळते. कोळी गीतांच्या धरतीवर लिहिलेल्या या कवितेत समुद्र व नाव यांच्या प्रतिमा घेऊन या कवितेतील प्रेयसी आपल्या मनातील उसळत्या भावनांचे चित्रण करते. 'समिंदरात' तुफान आलं आहे त्यामुळे उठलेल्या लाटामध्ये तिचा तारू डोलू लागला आहे म्हणून ती म्हणते 'माझी नाव संमिदरात लोटू नको'..... माझी दिलदौलत लुटू नको. शेवटी मात्र ती तिला समर्पित होण्यास तयार होते आणि म्हणते -

''सुरू लाटांचा धिंगा
दोघे घालू ये पिंगा
चल चल सारंगा
जरी उलटलं तारु समिदरांत
माझ्या जीवाचं तारुं तुझ्या हातांत
अर तांडेला वल्हव भरारा थांबू नको!
नाव संमिदरात माझी लोटू नको!'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ५८)

शृंगाराचे सूचक व संयमित चित्रण करण्याचे कौशल्य या दोन्ही कवितेतून दिसून येते.

**शृंगारिक लावण्या :**

प्रेमिकांच्या भेटीचे असेच एक चित्रण 'मी आले आंघोळीला'(पृ.५९) या कवितेत केले

आहे. दुपारच्या वेळेला नदीवर ती आंघोळीला जाते, तेव्हा भुरभुरणारे केस कानाजवळ येऊन तिला सांगतात -

''जाऊ नको तू अशी एकटी
येईल कुणि तरि शिकारीला''   (सावळ्या विठ्ठला, पृ. ५९)

तरी तो धिटाईने तिला पाहतो. हळूच येऊन तिचे डोळे झाकतो तेव्हा तिची होणारी भावस्थिती कवीने सूचकतेने रेखाटली आहे -

''बाग केळीचा सळसळला
पदर छातिवर फडफडला
टक लावुन नको पाहू मला
    मी बसले आंघोळीला
    मी आले आंघोळीला''   (सावळ्या विठ्ठला, पृ. ५९)

तर 'नका गडे गालांत हसू!' (पृ. ६0) या कवितेत प्रेमिकांच्या भेटीचे व त्या प्रसंगीच्या शृंगाराचे उत्कट चित्रण आले आहे. उदा.-

''प्रणय रसाला भरते आले
घेऊं भराभर भरुनी प्याले
भानावरि जरि असू नसू !
नका गडे गालांत हसूं!''   (सावळ्या विठ्ठला, पृ. ६0)

येथेही मागच्या एका कवितेतील नायिकेप्रमाणे लोकांची भीती वाटते म्हणून ती म्हणते-

''मारुनि टिचकी गालावर अशी
धरिता मजला कां करपाशी
पाहिल कुणि या दूर बसूं।
नका गडे गालांत हसूं !''   (सा.वि.पृ. ६0)

या कवितामधून प्रेमिकांच्या सहवासातील धुंदीचे वर्णन केले आहे. त्यात केवळ शृंगारच नाही तर उत्कट प्रेमही आहे, त्यामुळे शृंगाराला उदात्ततेची बैठक लाभली आहे. रा. ना. पवारांच्या या लावण्या व गीते शृंगारिक असले तरी ती अश्लिल व उत्तान बनलेली नाही. हा त्यांच्या प्रेमकवितांचा विशेष म्हणावा लागेल. त्याचबरोबर कवीच्या मनाचा सुसंस्कृतपणाही म्हणावा लागेल.

**स्त्री सौंदर्याचे मोहक चित्रण :**

प्रेम व शृंगाराप्रमाणे स्त्री सौंदर्याचे आणि तिच्या विभ्रमाच्या सौंदर्याचे वर्णन 'सांग कुठे शिकलीस? (पृ.६१) या कवितेत आढळते. हे एक सुंदर शब्दचित्रच आहे. तिचा आवाज, तिचे केस, तिचे चालणे, बोलणे, नजर फेकणे या सर्वांचे या कवितेत कवीने नाट्यमय चित्रण केले आहे. कारण तिच्या प्रत्येक गोष्टीचा प्रियकराच्या मनावार परिणाम झाला आहे. त्या दृष्टीने पुढील वर्णन पाहाण्यासारखे आहे -

''आनितंब तव रुळे शेपटा
भुर्भुरती या लाडक्या बटा
कचपाशी मम जीव बांधण्या सांग कुठे शिकलीस?
पावलागणिक घेसी मुरका
प्रेमळ हृदया देउनि धोका
पायदळी मग हृदय तुडविण्या सांग कुठे शिकलीस?'' (सावळ्या विठ्ठला पृ. ६१)

...

''पाजविसी नेत्रींची मदिरा
अवचित हृदयी मारिशी सुरा
खेळ भयंकर असे खेळण्या सांग कुठे शिकलीस?'' (सावळ्या विठ्ठला पृ. ६१)

या कवितेतील प्रत्येक कडव्याच्या शेवटी आलेला 'सांग कुठे शिकलीस ?' हा प्रश्न या कवितेत भावसौंदर्याबरोबर नाट्यसौंदर्य ही निर्माण करतो ही कवीची कलात्मकता होय.

**विरह भावनेचे चित्रण :**

सौंदर्य, प्रेम व शृंगार याबरोबर त्यांनी काही कवितांतून विरह भावनेचे चित्रणही केले आहे. 'निळ्या नभी या' (पृ.६६) या कवितेत प्रेयसीची वाट पाहणाऱ्या प्रियकराच्या मनातील विरह भावनेचे भावनोत्कट चित्रण आले आहे. ती येणार म्हणून तो उत्कटतेने वाट पाहतो, परंतु ती येत नाही. तिच्यासाठी गंध आणणारा वारा परत निघून गेला. श्रावणातला गडगडणारा मेघ वर्षाव न करताच निघून गेला. सतारीवरचे दिडदाचे सूर अडखळले, अशा सुंदर कल्पनेचे कवीने चित्रण करुन पुढे म्हटले आहे -

''स्वप्नमंदिरी प्रीत-फुलांचा

हार करी माझ्या सुकला
वाट पाहुनी डोळे शिणले
अश्रू नयनीं ओघळला''    (सावळ्या विठ्ठला, पृ.६६)

ही प्रियकराच्या मनातील विरह भावना आहे तर 'चल ये रे श्रीरंगा'(पृ.५७) या कवितेत प्रेयसीच्या मनातील विरह भावनेचे चित्रण केले आहे. संत कवींच्या विरहिणीतील अर्थभावना या ही कवितेत आढळते. ही एक उत्कट प्रकाराची 'गौळण'ही आहे. यातील राधा गोपी श्रीकृष्णाची वाट पाहते आहे. त्यांच्या वाटेला डोळे लावून बसली आहे. काही करुन त्यांनी यावे. पाहिजे तर घट फोडून दही, दुध, लोणी घ्यावे, पण एकवार तरी भेटावे म्हणून आर्तपणे ती म्हणते -

''घनश्यामा गोविंदा
ना सुचे कामधंदा
तुजविण भासे सुनें सुनें
मनमंदिर माझे रे''    (सावळ्या विठ्ठला, पृ. ५७)

**शब्दविलासातून शृंगार भावना :**

प्रेमभावनेच्या विविध छटांचे घडणारे हे दर्शन भावमय व नाट्यमय असल्याने कमालीचे प्रत्ययकारी वाटते पण असा प्रत्यय 'नजर' (पृ.८५) या कवितेत येत नाही. या कवितेत कवी शाब्दिक चमत्कृतीमध्ये गुरफटला आहे. त्यामुळे भावनेपेक्षा शब्दांचाच खेळ अधिक असतो. मात्र एक शब्दसौंदर्य म्हणून या कवितेकडे पाहता येते. 'नजर' या एका शब्दाच्या आधारे कवीने अनेक वाक्प्रचार व शब्दगंध वापरुन प्रेमभावनेचा आविष्कार केला आहे. उदा.

''नजरेचा खेळ म्हणून नजरेला नजर दिली
नजर व्हावयाच्या आतच नजरकैद झाली ।।''    (सावळ्या विठ्ठला, पृ. ८६)
...
''नजरेचे पारणे फिटण्यासारखी नजर पाहिजे
त्यासाठी नजरेच्या नजाकतीची कदर पाहिजे ।।'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८६)

ही एक कविता सोडली तर बाकीच्या कवितांमधून भावनेची उत्कटता जाणवते. त्यांच्या प्रेमकवितामध्ये स्त्रीच्या सौंदर्याचा, सौंदर्यात्मक विभ्रमाचे सुंदर चित्रण आढळते. हे प्रेम पती-पत्नीतील आहे, तसेच प्रियकर-प्रेयसी यांच्यामधील आहे. पती-पत्नीतील प्रेम-भावनेचे चित्रण करताना काही कवितांतून त्यांनी शृंगाराचे चित्रण केले आहे, तरी तो शृंगार नर्म विनोदाचा आहे. त्यामुळे अशा कवितामध्ये एक

प्रकारची प्रसन्नता व सात्विकता आढळते तर प्रियकर-प्रेयसी यांच्यातील प्रेम भावनेचे चित्रण करताना त्यातील शृंगार काहीसा उत्कटरुप धारण करतो पण संयमाची सीमा मात्र सोडत नाही. हे विशेष होय. काही कवितांमधून विरहभावनेचे चित्रण केले आहे. त्यात विरहाबरोबर उत्कट प्रेमभावनेचेही दर्शन घडते; परंतु या सर्वच प्रेमगीतांवरुन लावणी ढंगाचा बराचसा प्रभाव जाणवतो. या कवितांना एक विशिष्ट प्रकारची गेयता असल्याने त्या कविता वाचण्यापेक्षा गाण्याच्या स्वरुपात ऐकताना या कवितातील प्रेमभावनेचे सौंदर्य अधिक जाणवते.

**सामाजिक कविता :**

कवी रा. ना. पवार यांच्या कवितामध्ये सामाजिकतेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. समाजातील दु:ख, दारिद्र्य, विषमता यामुळे सामान्य माणसाची पिळवणूक कशी होते आणि पिळवणूक करणारे श्रीमंत लोक मात्र कसे सुखात असतात. याचे विदारक व वास्तव चित्रण त्यांनी केले आहे.

**भारतातील गरिबांच्या पाचवीला पूजलेले दारिद्र्य :-**

आपण भारतीय संस्कृतीचा ती फार महान आहे म्हणून अभिमान बाळगतो, परंतु या थोर संस्कृतीमध्येच बहुसंख्याक लोकांच्या वाट्याला दारिद्र्य आले आहे. सामान्य माणूस दारिद्र्यात होरपळत आहे तर श्रीमंत माणूस बहरत आहे. श्रीमंताच्या हातात सत्ता असल्याने संपत्ती त्यांच्याच हातात आहे, परंतु गरीबांना अब्रू बिनव्याजी गहाण ठेवून जगावे लागते, म्हणून भारतातील अनेक गरीब मुस्लिम मुली अरबांना विकल्या जातात. बायको बनण्यापेक्षा त्या 'भोगयंत्रे' बनतात. तरीही आम्ही संस्कृतीच्या महानतेचा जप जपतो म्हणून कवी उपहासाने म्हणतो-

''आमचा देश महान आहे
अध्यात्म्याची खाण आहे
आमचा देश महान आहे
संस्कृती त्याहून महान आहे
सांप्रत या सर्वाहून
आमचे पोट महान आहे
पोटाकडे आमची अब्रू
बिनव्याजी गहाण आहे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. १७)

हीच स्थिती हिंदू समाजातही आहे. हुंडा देता येत नाही, म्हणून मुलींची लग्ने होत नाहीत किंवा आईबापांना कर्जबाजारी व्हावे लागते. केवळ दारिद्र्यामुळे ही स्थिती निर्माण होते. म्हणून ते म्हणतात-

''समाजवाद, साम्यवाद
राष्ट्रवाद, विश्ववाद
या सर्वांना गिळून टाकतो
भारतामधला पुंजीवाद'' (सावळ्या विठ्ठला, पृ.१८)

त्याचबरोबर या परिस्थितीला 'मनाची मरगळ' व 'रुढीचे गरळ' याही गोष्टी कारणीभूत आहेत, म्हणून याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. साहित्यिकांच्या लेखणीने या विरुद्ध शांतीचा पुकारला पाहिजे . तरच त्यात माणसाचे माणूसपण दिसून येईल म्हणून ते म्हणतात -

''जोवर जगांत माणूस आहे
माणसाजवळ लेखणी आहे
तोवर क्रांती अटळ आहे
तोवर क्रांती अटळ आहे.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. १८)

**मजुरांच्या उध्वस्त जीवनाचे चित्रण :**

अशा प्रकारचे दारिद्र्य गिरणी कामगारांच्या वाटेलाही येते, जो पर्यंत गिरणी चालू आहे, तोपर्यंत संसार व्यवस्थित चालू असतो, पण गिरणी बंद पडली तर त्यांचे जीवन उध्वस्त होते. सोलापूरला जुनी गिरणी बंद पडल्यानंतर गिरणी कामगारांचे किती हाल झाले हे कवीने जवळून पाहिले आहे, आणि त्यांचे अंतःकरण विदीर्ण झाले. 'ज्या दिवशी गिरणीचा भोंगा बंद झाला त्याच दिवशी चुलीतला अग्नीसुद्धा थंड झाला! अशावेळी केवळ अश्रू ढाळून उपयोग काय? म्हणून कवी म्हणतो -

''आणि तोच अग्नि जेव्हा पोटामध्ये पेट घेतो
डोळ्यांतल्या पाण्याने का थोडाच तो थंड होतो ?''(सावळ्या विठ्ठला, पृ. २१)

गिरणी बंद पडल्यानंतर नवरा निघून गेला आणि त्यांनी भोंगावरुन उडी मारुन जीव दिला तेव्हा विधवा झालेल्या स्त्रीचे आक्रंदन 'आज भोंगा वाजत आहे' (पृ.२१) या कवितेत चित्रीत केले आहे. गिरणी बंद पडण्यास राजकारणाचे डाव कारणीभूत होतात, हे ही कवी सांगतो.सरकारही मजूरापेक्षा मालकांचेच हित पाहते म्हणून तो म्हणतो -

''गरिबांच्या संसाराची करुनीया अशी होळी
श्रीमंताच्या संसारात पिकतसे रोज पोळी'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३१)

म्हणून गिरणीचा भोंगा वाजतो, तेव्हा या दारिद्र्य विधवेच्या आशा पल्लवित होतात.

**भिकाऱ्याच्या भीषण दारिद्र्याचे चित्रण :**

समाजामध्ये दारिद्र्य किती भीषण आहे, याचे चित्रण 'माझा गुरू' (पृ.६३) या कवितेत कमालीच्या विदारकतेने आले आहे. या कवितेत कवीने एका भिकाऱ्याच्या मुलाचे करुण चित्र रेखाटले आहे. भीक मागून तो पोट भरायचा. एकदा भर पावसात तो भीक मागण्यासाठी कवीच्या दारी आला. एवढ्या पावसात तो लहान मुलगा भीक मागायला येतो. त्यांची आई का येत नाही? असा प्रश्न कवीला पडतो, तेव्हा भिकाऱ्याचा मुलगा म्हणतो 'बाप पळून गेला अन् कालच माझ्या आईला ल्योक झाला-

''मग तिचं पोट कसं भरनार?
अन् लेकराला दूध कसं येनार?'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ६४)

म्हणून कवीकडे तो याचना करतो की -

''आज आक्की भाकर अन् एक पोतं दे
बाळूत्यासाठी एक फाटकं लुगडं दे'' (सावळ्या विठ्ठला, पृ.६४)

कवीला त्या मुलाची करुणा आली कवीने पोतं, फाटकं पातळ आणि एक भाकर दिली. त्यापेक्षा कवी मोठ्या गौरवाने म्हणतो, 'विधात्याची वत्सलता मला नव्या रुपात कळली!' एका भिकाऱ्याच्या मुलाच्या अंतःकरणातील मातृभक्ती कवीला कौतुकास्पद वाटते म्हणून तो म्हणतो -

''माझ्या मातृभक्तीचा सारा अहंकार आज गळाला
कारण मातृभक्ती शिकवणारा एक महान गुरु मला मिळाला''(सा. वि., पृ. ६४)

एका भिकाऱ्याच्या मुलाकडे कवी कसा वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो हे यातून दिसून येते आणि त्याच बरोबर दीन-दलितांच्याबद्दल कवीच्या मनात किती आत्मियता व आपुलकी आहे यांचेही दर्शन या कवितेतून घडते.

**समाजातील विषमतेचे चित्रण/'प्राक्तन' हे एक जीवनसत्य :**

समाजातील विषमतेचे विरोधी नाट्यात्मक चित्रण 'प्राक्तन' (पृ.३४) या कवितेत

दारवविले आहे. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील भेद आणि विरोध त्यांनी या कवितेत अर्थपूर्णतेने चित्रीत केले आहे. उदा.

''झोपडीत बाळ रडे अंगाई कुणी गाईना
श्रींमताच्या मोटारीत रेडिओच्या येती ताना'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३४)
...
''जेवता कुणी येईना दोन्ही हात त्याचे थोटे
जेवताना कोणाकोणा पाहिजेत चमचे काटे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ३४)

परंतु यापेक्षा वास्तववादी व विदारक चित्रण या कवितेत पुढे आले आहे. हे कवितेतील खालील ओळीवरुन दिसून येतो -

''फाटलेल्या वस्त्रातून कुणी लपविते अंग
झिरझिरत्या वस्त्रातून कोण दाखविते अंग
औषधावाचून कोठे दगावती पोरे बाळे
अन्नपचावया कोणा औषध हवे चांगले''(सावळ्या विठ्ठला, पृ. ३४)

मनुष्य गरीब असो किंवा श्रीमंत पण 'प्राक्तन' दोघानांही कोणत्यातरी प्रकारचे असते हे एक जीवनसत्य त्यांनी या कवितेतून मांडले आहे.

**भावनाशून्य यंत्र व अर्थ प्रधान संस्कृती :**

कवी रा. ना. पवार यांनी सर्वसामान्यांच्या वाटेला येणारे दुःख दारिद्रय यांचे चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे आजच्या अर्थप्रधान व यंत्रप्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या मोठ्या शहरातील मध्यम वर्गीयांच्या जीवनात ज्या समस्या निर्माण झाल्या. त्या माणुसकीला पारखे होणारे जीवन त्यांच्या वाट्याला आले. त्यांचेही चित्रण काही कवितातून केले आहेत. 'मुंबईची चाळ' (पृ. ६७) या कवितेत मुंबईतील चाळीमध्ये राहणाऱ्या मध्यवर्गीयांचे चित्रण केले आहे. ते केवळ मुंबईपुरते मर्यादित नसून भारतातील कोणत्याही मोठ्या शहरातील समाजालाही उद्देशून आहे. शहरात राहणाऱ्या मध्यमवर्गीयाच्या वाटेला येणारे दुःख काहीसे उपहासाने चित्रण या कवितेत केले आहे. उदा. -

''एकच खोली दहादहाची आणि लोक वीस
त्या विसाचे दरवर्षाला होती पंचवीस'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ६७)

अशा चाळीतील जिना म्हणजे 'लक्ष्मण झुला' आहे, तर

''तळमजल्याच्या बिऱ्हाडकरुने नळ चालू केला
चौथ्या मजल्यावरचा नळ तो संपावर गेला.''(सावळ्या विठ्ठला, पृ. ६७)

वरच्या माडीवरुन खाली टाकला जाणारा कचरा जणू 'टालकम पावडर' होय. अशा चाळीत माणसे एकत्रित राहत असली तरी त्यांचे परस्पराशी कोणतेच संबंध नसतात, म्हणून कवी म्हणतो-

''शेजाऱ्याच्या घरात कुणी तर स्वर्गाला गेला
वर्तमानपत्रांत वाचून कळते ते त्याला'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ६८)

म्हणून शेवटी कवीने म्हटले आहे. अशा 'नरकयातना' जेथे आहेत ती चाळ म्हणजे जणू मुंबईतील स्वर्ग आहे.

**मानवतेची विटंबना :-**

दु:ख, दारिद्र्य, विषमता, अन्याय असलेल्या आजच्या या समाजात मानवतेची हरगडी विटबंना होत असते. याचे दु:ख 'मानवता'(पृ.२८) या कवितेत व्यक्त केले आहेत. स्वातंत्र्यपूर्वी किंवा स्वातंत्र्यानंतर काय मानवतेची सतत विटंबनाच चाललेली आहे. स्वातंत्र्यानंतर ही विटंबना कमी होईल असे वाटले होते पण त्याचे फलित काय? म्हणून कवी म्हणतो, 'हाय! सुमंगल चिन्हे निष्प्रभ झाली निमिषांतरी' ही विटंबना दूर करण्यासाठी 'मानवता' प्रभूचरणी प्रार्थना करते.

**पर्यावरण प्रदूषण :**

या वैज्ञानिक कालखंडात पर्यावरणाचा प्रश्न भीषण बनला आहे. दु:ख, दारिद्र्य, विषमता याप्रमाणे पर्यावरण देखील आजची समस्या आहे. मराठीतील किती कवींनी त्याची दखल घेतली. रा. ना.पवार समकालीन समाजाच्या वास्तवतेला त्यांच्या संवेदनशीलतेमुळे सामोर जातात. हे 'माणसा तू नष्ट होशील' (सावळ्या विठ्ठला, पृ.११) या कवितेतून दिसून येते. ही एक रुपकात्मक कविता आहे. वृक्षाच्या मुखातून रा.ना. पवारांनी माणसाचे दु:ख व्यक्त केले आहे. या कवितेतील वाळलेला वृक्ष म्हणतो -

''आजपर्यंत मी ज्याला
सावली देत आलो आहे
तोच माणूस माझ्यापासून
आल्या पावलीं परततो आहे'' (सावळ्या विठ्ठला, पृ.११)
...

''तोडा जंगले बांधा बंगले
असेच आता होऊ लागले''　　　(सावळ्या विठ्ठला, पृ.१२)

अशीच वेदना तीर्थाची आई असलेल्या गंगाबाईही व्यक्त केली आहे. जनजीवन पवित्र करणाऱ्या गंगामाईचे पवित्र पाणी माणसाने मलिन केले आहे. आकाशातील निळ्या ढगाचे रंग कारखान्याच्या धुरामुळे काळे होत आहेत. पावसाची धार सुद्धा काळी होत आहे. याला कारण आजची स्वार्थी आणि ढोंगी प्रवृत्ती आहे म्हणून कवी उपहासाने म्हणतो -

''आधी करायचे खच्चीकरण
मग करायचे वनीकरण
आधी करायचे दुर्गंधीकरण
मग करायचे शुद्धीकरण''　　　(सावळ्या विठ्ठला, पृ. १३)

निसर्गामध्ये हे जे प्रदूषण निर्माण झाले आहे याचे कारण प्रलोभन होय, तसं माणसाचे मन ही दूषित बनत चालले आहे. प्रथम मनुष्याच्या मनाचे शुद्धीकरण झाल्याशिवाय ही परिस्थिती सुधारणार नाही म्हणून कवी इशारा देतो -

''स्वार्थी माणसा सांग केव्हा सीधासाधा माणूस होशील
नाहीतर एके दिवशी तू सुद्धा नष्ट होशील''
तू सुद्धा नष्ट होशील　　　(सावळ्या विठ्ठला, पृ.१३)

पर्यावरणासारख्या एका आधुनिक समस्येचा रा. ना.पवार वेध घेतात हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातून त्यांची सामाजिक जीवनाबद्दलची, व माणसाचे जीवन सुखी, समृद्ध आणि संपन्न होण्यासाठी कळकळ दिसून येते.

**ग्रामीण व शहरी जीवनातील विरोध :**

आजच्या या आधुनिक जीवनातील समस्येचे एक मनोरंजन चित्रण त्यांनी 'पावना मी खेड्यामधला!'(पृ.६२) या कवितेत केले आहे. खेड्यामधला पावना मुंबई बघायला जातो, तेव्हा त्याला येणाऱ्या अनुभवाचे मजेशीर चित्रण या कवितेत केले आहे. ग्रामीण व शहरी जीवनातील विरोधाचे चित्रण या कवितेत दाखविले आहे. पुढील चित्रणातून त्यांची सामाजिकता दिसते. उदा.

''मुंबईत पैशाला हो काडीचीही किंमत नाही
पान्यावानी पैसा जातो.कसा त्येच समजत नाही

एक गिलास पानी मिळतयं पाच पैशाला ॥''

....

''संग समद्या नोटा घेवून सिनेमा बघाया गेलो
खिसा माझा कापल्याला बघून गड्याचीत मेलो
ठनाठना शंख करुनी आलो खेड्याला ॥''          (सावळ्या विठ्ठला, पृ.६२)

शहरी भागातील सामाजिक जीवनाचे असेच एक प्रत्ययकारी चित्रण 'कोंबडा'(पृ.२५) या कवितेत रेखाटले आहे. स्वतः कवी रेल्वेखात्यात नोकरीला असल्यामुळे रेल्वेतील दैनंदिन जीवनातील सुंदर शब्दचित्रण त्यांनी या कवितेत रेखाटले आहे. स्टेशनवर वाढणारी हळूहळू गर्दी, रेल्वे स्टाफचे रेल्वे इंग्लिश याचे हुबेहुब चित्रण केले आहे. त्यातच एका अडाणी माणसाची उडालेली धांदल त्यांनी मिश्किलपणे रेखाटली आहे. गाडी सुटताच साहेबाला तो गाडी थांबण्यासाठी विनंती करतो -

''सामान समदं उतरुन झालं, परंतु साहेब विपरित झालं
एकदोन लेकरं सापडत नाहीत, बायको अन् मेव्हणी दिसतच नाहीत
तोच लांबून आली हाक, 'कारभांरी आम्ही हिकडं हाव
समदी लेकरं बरोबर हायती तुमचीच आम्हाला धास्ती होती
त्याची त्याला चूक कळली, गार्ड हसला, गाडी ढळली.''          (सा.वि., पृ.२६)

समाजातील विविध स्तरावरील लोकांच्या स्टेशनवरच्या गंमती त्यांनी मिश्किलपणे यात चित्रीत केले आहे. या सर्व सामाजिक कवितांकडे पाहिल्यानंतर असे दिसून येते की भिकारी, कामगार, मजूर अशा दीन दलितांच्या जीवनाचे चित्रण करण्यात त्यांना अधिक रस आहे. त्यांच्या जीवनाचे कधी वास्तवतेतून कधी उपहासातून तर कधी विनोदातून ते चित्रण करतात. पण त्या पाठीशी सहानुभूतीचा ओलावा आहे, म्हणून निर्मलकुमार फडकुले यांनी म्हटले आहे, ''भक्तिनिष्ठेपेक्षा समाजनिष्ठेचाच त्यांच्या काव्यावर कितीतरी अधिक प्रभाव पडल्यामुळे या कवितेतील अनुभवाचे क्षेत्र संकुचित राहिलेले नाही.''[१५] त्याचप्रमाणे चंद्रभूषण कुलश्रेष्ठ म्हणतात, ''समाजजीवनातील, संसारचित्रातील विरोधाभास, विसंगती चटकन शब्दांच्या चिमटीत पकडणारा गीतकार होय.''[१६]

**राष्ट्रीय कविता :**

कवी रा. ना. पवार यांच्या कवितेतील लक्षणीय विषय म्हणजे त्यांची राष्ट्रीय कविता होय. बालपणापासूनच त्यांना राजकारणाची ओढ होती. स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकीय आंदोलनामुळे

त्यांच्या मनात देशभक्तिची ऊर्मी निर्माण झालेली होती. मॅट्रीकला असतानाच ऑगस्ट १९४२ च्या क्रांती लढ्याच्या वेळी अनेक मोठ्या नेत्यांना अटक झाली, तेव्हा त्यांचे मन पेटून उठले आणि सरकारचा निषेध करण्यासाठी प्रशालेतील पाचशे-सहाशे मुलांमुलींचा त्यांनी मोर्चा काढला ही आठवण महत्वाची ठरते.[१७] एका सामान्य कुटुंबातील आलेल्या या तरुण कवीच्या मनात राष्ट्रभक्तिची ऊर्मी निर्माण व्हावी हे विशेष होय. कवीचे संवेदनशील व भावूक मन स्वातंत्र्य आंदोलनातील घटना पाहत होते आणि आपल्या परीने त्या आंदोलनाला मदतही करीत होते. सरकार विरोधी पत्रके वाटणे, भूमिगत कार्यकर्त्यांना मदत करणे असे अनेक भूमिगत कामेही त्यांनी केली कारण या कवीचे या देशावर प्रेम होते म्हणून पारतंत्र्याची चीड व स्वातंत्र्याची ओढ निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर अनेकांप्रमाणे ते ही राजकारणापासून अलिप्त राहिले असले तरी त्यांच्या मनातील राष्ट्रभक्तिची ज्योत मात्र तेवतच राहिली. स्वातंत्र्यानंतर राजकारण पुढाऱ्यांचा स्वार्थ, त्यांचे ढोंग यांची त्यांना चीड येते. म्हणून अनेक कवितांतून त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे. सन १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा मात्र या कवीच्या मनातील राष्ट्रभक्ती प्रज्वलित झाली आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर संग्रामगीते लिहिली. ती मराठी राष्ट्रीय कवितेचा मौलिक ठेवा आहे. या सर्वांचा अर्थ असा होतो की, रा. ना. पवारांच्या कवितेतील राष्ट्रीय भावना ही केवळ अनुकरणातून आलेली नसून ती अनुभवातून आली आहे. कवी रा. ना. पवार यांच्या कवितेचे तीन भाग पडतात.

१. स्वातंत्र्यपूर्व काळातील कविता

२. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राजकीय जीवन चित्रण करणारी कविता

३. चीन-भारत युद्धावरील कविता.

**पुतळा संस्कृती/स्वार्थी पुढाऱ्यांचे चित्रण :**

सन १९३० मध्ये सोलापूरला 'मॉर्शल लॉ' पुकारण्यात आला आणि मल्लाप्पा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, शंकर सारडा, जगन्नाथ शिंदे या चार स्वातंत्र्यविरांना फाशी देण्यात आली. कोणत्याही सच्चा राष्ट्रभक्ताच्या मनात या घटनेने चीड निर्माण होणे स्वाभाविक होते. ती चीड रा.ना. पवारांच्याही मनात निर्माण झाली. नि:स्वार्थीपणाने आपल्या आयुष्याचा होम करणाऱ्या हुतात्म्याचे स्मरण करताना कवीला स्वार्थीपणाने राजकारण करणाऱ्या आजच्या पुढाऱ्यांचे चित्रही दिसते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील त्यागी व नि:स्वार्थी नेते आणि आजचे स्वार्थी पुढारी या दोघांचे परस्परविरोधी चित्रण 'माझा संभ्रम मिटेल का?'(पृ.१९) या कवितेत त्यांनी उत्कटपणे केले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात

गांधी टोपी घालणारे देशभक्त नि:स्वार्थीपणाने आंदोलनात भाग घेत होते, म्हणून गांधी टोपीला पावित्र्य होते, परंतु आज गांधी टोपींचे पावित्र्य स्वार्थी नेत्यांनी घालविले आहे. म्हणून कवी म्हणतो -

''तेव्हा गांधी टोपीला कुणी टोपी घातली नव्हती
साधी भोळी गांधी टोपी वाकडी तिरपी झाली नव्हती
झोकदार टोकदार फॅशनवाली झाली नव्हती'' (सावळ्या विठ्ठला, पृ.१९)

पुढे कवी उपहासाने म्हणतो -

''तेव्हाचं रक्त सभेपुरतं सळसळतं नव्हतं
तिकीट नाकारल्यावर जळफळत नव्हतं
कारण तेव्हा तिकीटचं नव्हतं
तेव्हाचं पाऊल खुर्चीकडे वळत नव्हतं''

...

''तेव्हाचा नेतेपणा पोरांचा खेळ नव्हता,
चोरांचा खेळ नव्हता
तो एक अवघड असा तारेवरचा खेळ होता
जिवा शिवाचा मेळ होता'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२०)

म्हणून कवी गौरवाने म्हणतो -

''तेव्हा देशभक्ति, निर्भेळ होती, शुद्ध होती, पवित्र होती
निर्लेप होती, भेसळ नव्हती
तिथे कसलीही तडजोड नव्हती'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२०,२१)

म्हणूनच सोलापुरातील चार देशभक्तांनी घरादारावर तुळशीपत्र ठेवून बायकां पोरांना वाऱ्यावर फेकून स्वप्राणावर पाणी सोडून सोलापूर स्वतंत्र केले आणि तीन दिवस का होईना स्वातंत्र्य उपभोगले. त्या देशभक्तांनी हसत हसत मरण पत्करले आज मात्र आम्ही केवळ हुतात्म्याचे पुतळे उभा करुन मोकळे होतो. काय उपयोग त्याचा? म्हणून कवी म्हणतो त्याचा आदर्श न ठेवता पुतळे उभारण्यात काय अर्थ आहे. या संदर्भात आजच्या 'पुतळा संस्कृतीवर' उपहासाने भाष्य करताना कवी म्हणतो -

''पुतळ्यांची रांग लागली

पाखरांची सोय झाली
जेता गेला नेता आला
दीड फुट हसण्याचा नवा प्रकार घेऊन आला
त्याच्या हस्ते त्या पुतळ्यांना अधूनमधून हार घाला
असा प्रत्येक भारतीय ऋणातून मुक्त झाला
स्वातंत्र्य देवतेच्या पूजेसाठी ज्यांनी जीवदान दिले
त्यांच्या पुतळ्यांना आम्ही मध्यवर्ति स्थान दिले
सारे फिटंफाट झाले, आमचे धंदे सुरु झाले''        (सावळ्या विठ्ठला, पृ. २०, २१)

या उपहासावरील भाष्य कवीच्या स्वभावाप्रमाणे तिखट आहे, परंतु त्याही पेक्षा अधिक तिखट चीड त्यांनी पुढे व्यक्त केली आहे. आजचा एखादा खासदार 'हे बापुजी कोण?' असे विचारतात, हे पाहून कवीला कमालीची चीड येते म्हणून कवी म्हणतो -

''ऐकलत ना बापूजी, खाली या अन् सांगा तुम्ही कोण?
तुम्हाला वाटलं माझा देश विसरणार नाही
ही तुमची परवड होतेय प्रकाश पडतोय कां काही?
देशभक्ती कराल फिरुन? देशासाठी मराल फिरुन?
घ्या बघू तोंडात मारुन
त्यागी कोणी, योगी कोणी
स्वातंत्र्य सैनिक कोण, हुतात्मा कोण?
कोणालाही राहिली नाही या सर्वांची साधी जाण''        (सावळ्या विठ्ठला, पृ. २२)

कवीच्या या कठोर उद्‌गारात त्याच्या मनातील तळमळ दिसून येते. हे सांगताना कवीने सुंदर शब्दांत भाष्य केले आहे, तो म्हणतो -

''जगानं कौतुक करावं म्हणून फूल फुलत नाही
कुणी फुलांचे हार घालावेत म्हणून फू ल फुलत नाही
धंदा म्हणून नव्हे तर धर्म म्हणून फूल फुलतं
हुतात्म्याचं प्राणपुष्प धर्म म्हणून होरपळतं''        (सावळ्या विठ्ठला, पृ.२३)

आजच्या या धंदेवाईक जगात 'फुलानं का फुलावं' आणि 'हुतात्मानं का मरावं' असा संभ्रम कवीला पडला आहे. रा. ना. पवारांच्या राजकीय कवितामध्ये ही एक अर्थपूर्ण कविता आहे.

**धंदेवाईक राजकारण :**

आजच्या या धंदेवाईक राजकारणामुळे या देशातील अनेक गरीब मुलींची अरब राष्ट्रामध्ये विक्री होते हे वाचून कवीचे अंतःकरण विदीर्ण होते. भारतीय राजकारणाची दोरी माता असलेल्या एका स्त्रीच्या हातात असताना ही घटना घडावी आणि कायदाही हतबल व्हावा याचे कवीला आश्चर्य वाटते. या धंदेवाईक प्रवृत्तीमुळे भारतात पुंजीवाद आला आणि समाजवाद, साम्यवाद, राष्ट्रवाद, विश्ववाद यांना गिळून टाकले याची कवीला खंत वाटते. अशी स्थिती असली तरी कवी आशावादी आहे, त्यांची माणसावर निष्ठा आहे. अशा घटनाविरुद्ध सामान्य माणसाच्या मनामध्ये कधीतरी क्रांतीची ज्योत पेटेल म्हणून कवी म्हणतो -

''जोवर जगात माणूस आहे
माणसाजवळ लेखणी आहे
तोवर क्रांती अटळ आहे
तोवर क्रांती अटळ आहे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. १८)

आजच्या राजकारणामुळे 'मानवतेची' स्थिती दैन्य झाली आहे. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व यांचे स्वप्न बाळगून आमच्या पूर्वीच्या नेत्याने स्वातंत्र्याचा लढा दिला; परंतु स्वातंत्र्यानंतर ही स्वप्ने भंग पावली याचे दुःख 'मानवता'(पृ.२८) या कवितेत सुंदरपणे रेखाटले आहे ते म्हणतात-

''समतेचा तो तिलक ललाटी
स्वतंत्रतेचे कंकण हाती
बंधुता तरी गळ्यात रुळती
हाय! सुमंगल चिन्हे निष्प्रभ झाली निमिषांतरी'' (सावळ्या विठ्ठला, पृ.२८)

असे असले तरी कवीच्या मनात आपला देश सामर्थ्यशाली बनावा अशी भावना आहे. राष्ट्रध्वज उंच धरताना आपल्या मनात राष्ट्रप्रेम असले पाहिजे. असे कविस वाटते -

''फितुरी अन् गद्दारी यावर जो पक्ष उभा
असल्या या पक्षांचे श्राद्ध करा, देश जपा'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ४३)

...

''विश्वाचे भाग्य आता सत्प्रवृत्त राष्ट्रावर
राष्ट्राचे भाग्य आता तुमच्यावर आमच्यावर

धर्मजाति पंथ भेद आमूलाग्र हे विसरुं
देशाच्या वृद्धीस्तव थोर एकजूट करूं
हाच एक मंत्र जपुन राष्ट्रध्वज उंच धरु
देशाला जगवाया मरणे अनंत मरू'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ४३)

**चीन-भारत युद्धावरील संग्रामगीते :**

इ.स. १९६२ मध्ये चीनने 'चिनी हिंदी भाई भाई' म्हणत भारतावर आक्रमण केले तेव्हा कवीच्या मनातील राष्ट्रभक्तिला स्फुर्ती आली आणि त्यांनी 'दैनिक संचार, सोलापूर' मधून दररोज एक याप्रमाणे २५७ छोटी छोटी संग्रामगीते लिहिली. या संग्रामगीतातून आक्रमणाबद्दलची चीड व स्वातंत्र्याचे प्रेम या भावना उत्कटपणे व्यक्त झाल्या आहेत. या कवितांविषयी त्यांनी म्हटले आहे, ''हिंदी चीनी भाई भाई'' असे तोंडाने म्हणणाऱ्या चिनी कसायाने भारतावर पाशवी आक्रमण सुरु केले. डोके भणाणून गेले. 'आपण काहीतरी केले पाहिजे असे सारखे वाटू लागले. आघाडीवर भारतीय जवान प्राणपणाने चिनी दुष्मनाशी सामना देत आहेत. अशा वेळी जनजागृति करुन प्रत्येक भारतीयाच्या अंत:करणात देशाभिमानाची ज्योत जागती ठेवण्याचे कार्य भारतातल्या सर्वच सरस्वतिभक्तांनी सुरू केले. मी ही माझ्या मगदुराप्रमाणे काही 'संग्रामगीते' लिहिली आहेत. चिन आक्रमणामुळे भारतीय जीवन सर्वच आघाडींवर होरपळून निघाले आहे. त्या सर्व आघाडीवरच्या दु:खांना दिलासा द्यावा म्हणून संचलनगीते, बालगीते, या काव्यप्रकारापासून ते थेट जात्यावरील गीतापर्यन्त या माझ्या गीतांनी संचार केला आहे. या संग्रामगीतामुळे भारताचे संरक्षण आणि संरक्षण निधी यांना हातभार लावण्याचा हा माझा प्रयत्न आहे.''[१८]

आक्रमण झाल्यानंतर आपल्या कुंचल्याने सारा देश पेटविण्यासाठी लहानापासून, तरुण,वृद्ध व स्त्रिया इत्यादी सर्व देशात चिनविषयी चीड निर्माण झाली पाहिजे. रा. ना. पवारांच्या संग्रानगीतांत प्रत्येक कवितेतील शब्दाशब्दात चीनविषयी चीड व्यक्त झालेली दिसून येते. प्रत्येक भारतीय 'नागरिकाचे कर्तव्य' (पृ.१२) या कवितेत कवी म्हणतो, ''प्रत्येकाचे कर्तव्य आहे की देशविघातक कृत्यांना उघडे पाडले पाहिजे. आपल्यातच राहून, आपलेच खाऊन आपल्याच देशात विघातक कृत्ये करणारे काही कसाई लोक आहेत. त्यांच्यावर लक्ष ठेवणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. कवींनी पुढील ओळीत समर्पक शब्दात चीड व्यक्त केली आहे-

''रणकुंड पेटले, आज जळे हिमगंगा
ही नीच पिशाच्चे नाच घालिती नंगा!'' (संग्रामगीते, पृ.१२)

या पिशाच्यांना वाटेवर आणण्यासाठी प्रत्येकाने विडा उचलला पाहिजे. प्रत्येकाने देश हे माझे घर आहे, म्हणून देशाविरुद्ध वाईट कृत्य करणाऱ्यांवर प्रत्येकाने लक्ष ठेवले पाहिजे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. देशावर कुटिल कारस्थान करणाऱ्यांना धडा शिकविला पाहिजे. 'फितुरी अन् गद्दारी यावर जो पक्ष उभा, असल्या पक्षाचे श्राद्ध करा-देश जपा.' असे आवाहन कवी 'देशाला जगवाया मरणे अनंत मरू' (पृ.१७) या कवितेत केले आहे व सर्वांना उद्देशून पुढे म्हणतात-

''छोट्यांनो, मोठ्यांनो, राजकीय पक्षांनो,
मातांनो, भगिनींनो, पक्ष्यांनो, वृक्षांनो
देशाच्या मुक्तीस्तव थोर एकजुट करा
आणि हाच मंत्र जपुन एकच उद्घोष करा
'हा तिरंगी राष्ट्रध्वज प्राणपणे उंच धरुं
देशाला जगवाया मरणें अनंत मरुं!'' (संग्रामगीते, पृ.१७)

आपले बंधू सीमेवर प्राणाची पर्वा न करता 'चिनी माऊच्या बोक्या' विरुद्ध लढत आहेत. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी 'शुभेच्छा सीमेवर धाडूं!' (पृ.२३) या कवितेत कवी सांगतो, 'आपला भारत देश हा शांतीचा सागर आहे. चीनने नीतीमत्ता सोडून 'पंचशील करार' मोडून अन्यायाने, स्वार्थीवृत्तीने आमच्यावर हल्ला केला. चीवर आक्रमण झाल्यावर डॉ. कोटणिस व त्यांच्या सारख्या अनेक भारतीय नवजवानांनी चीनसाठी प्राणाची आहुती दिली. त्यांना अशा गोष्टीची जाणीव तर नाहीच नाही. मग आपणच प्रामाणिकपणे व नीतीमत्तेने का वागायचे? म्हणून

''परस्परांचे शुभ चिंतावे' रिवाज हा मोडूं
भारतियांच्या सर्व शुभेच्छा सीमेवर धाडूं!'' (संग्रामगीते, पृ.२३)

असे आवाहन कवी सर्व जनतेला करतो.

सीमेवरती गेलेल्या सैनिकांना स्फूर्ती देण्यासाठी, त्यांच्या रक्तांत कणाकणात देशाभिमान जागविण्यासाठी कवी रक्त गोठवून ओरडून सांगतो 'अंतिम जय आपुल्या हाती' (पृ.६) या कवितेत सांगतो आहे -

''हिमालयाचे कडे सांगती अंतिम जय अपुल्या हाती
रणांगणाची सांगे माती
रक्तांच्या या खुणा सांगती

वृक्ष डोलती, लता सांगती
भ्रमर सुमंगल गुणगुणती अंतिम जय अपुल्या हाती!' (संग्रामगीते, पृ.६)

देशातील सर्वजण पारतंत्र्याला कंटाळलेले आहेत. येथील माती, फूले व फळे देखील कंटाळलेली आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या तोंडून आवाज येतो आहे प्रत्येकाने लढलेच पाहिजे. आपल्यातील वैभव पाहून येथे येणाऱ्या प्रत्येकाचे डोळे दिपतात व हे वैभव उपभोगण्यासाठी लालसी वृत्तीने आक्रमण करतात. असे कितीजण तर आले गेले पण येथे काही फरक पडलेला नाही-

''भूमी अपुली अरविंदाची
नेताजीची, श्री-शिवबाची
ऐका वाणी या रत्नांची
आज नाचले अधम किती अंतिम जय अपुल्या हाती!'' (संग्रामगीते, पृ.६)

कवीला येथील भूमिविषयी अत्यंत प्रेम आहे. त्यांच्या भावनाशील मन चीनच्या आक्रमणाने पेटून उठलेले आहेत व सारा देश देशभक्तिने पेटविण्याचा त्यांच्या परीने प्रयत्न केला आहे. कवीनी संग्रामगीतातून फार चीड व्यक्त केली आहे. पण त्यांचा सत्यावर विश्वास आहे म्हणून म्हटले आहे-

''सत्याला जरि ग्रहण लागले
असते त्याला मरण कोठले?
कणाकणांतून शब्द उमटले
भारतभूमी भाग्यवंती अंतिम जय अपुल्या हाती'' (संग्रामगीते, पृ.६)

'बंधूनो धरा जरा अभिमान' (पृ.९) या स्फुर्तिगीतांत कवीने देशातील जनतेला आवाहन केले आहे. आपल्या मायभूमीच्या रक्षणासाठी प्राणाची पर्वा न करता इंच इंच भूमीसाठी लढत रहा आणि आप-आपल्यातील हेवेदावे सोडून अभिमानाने ताठ मान करुन मायभूमीचे रक्षण करा-

''याचे चुकले, त्याचे चुकले!
युक्तिवाद हे आता कसले
समोर दिसते राष्ट्र पेटले
रक्त शिंपुनी आग शमवुं या देवुनिया बलिदान'' (संग्रामगीते, पृ. ९)

असे आवाहन जनतेला कवीने केले आहे. आपला देश हुतात्म्याची खाण आहे. हिमालयाचा कडाही माणसाळलेल्या चिनी लोकाविरुद्ध बाजीप्रभू सारखी खिंड लढवीत आहे व त्यांने ही भारतीय जनतेला आवाहन 'माणसा, तुला शिकवितो धडा' (पृ.११) या गीतात केला आहे. या दुनियेत जन्माला

आल्यानंतर काय घेऊन जायचे आहे. माणुसकीच फक्त जगामध्ये शिल्लक राहाणार आहे म्हणून कवीने म्हटले आहे -

''सत्य, शांतिचे करुन पालन
भाइबंद तव जगती जीवन
ती त्यांची दुर्बलता समजून
छळाया त्यांस उचलिसी विडा
माणसा, तुला शिकवितो धडा.'' (संग्रामगीते, पृ.११)

कधीही सत्याला मरण नसते. त्यासाठी फक्त मनात माणुसकीची ज्योत तेवत ठेवा व त्या माणुसकीच्या नावाखाली विटंबना व ढोंग करु नका. ज्या हिमालयात 'शिवाचे म्हणजे शंकराचे' स्थान आहे हा शंकर तरी जगाचा राजा असून तो आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला सडेतोड उत्तर का देत नाही? -

''आज तुझ्या हिमशिखरांमधुनी
आग वर्षवी चहुंबाजूंनी
तुझ्या कुशीतील रिपू भस्मुनी
हो शांत पुन्हा तूं हिमालया'' (संग्रामगीते, पृ. १६)

तुझे उग्ररुप धारण करुन एकदाच मिटवून टाक असे कवी म्हणतो. कवीचे मन बेचैन झाले आहे. काय करावे, कुणाला जागवावे आणि कधी शत्रूला मिटवावे हेच कवीला कळेनासे झाले आहे. जनता झाली, हिमालय झाले तरी काही बदल कवीच्या मनाला जाणवेना म्हणून कवी 'ऊठ ऊठ कैलासपती' (पृ.२०) या गीतात कैलासपतीला साकडे घालून कवी म्हणतो -

''वणवा उठला तुझ्या भोंवती
टुझी तपस्या घे आवरती
डोळे उघडून पहा सभोंती
नकोस समजूं 'बर्फ पेटला' अरे पेटली तुझी कुटी'' (संग्रामगीते, पृ.२०)

या मातीत, या मायभूमीत जे जे सजीव, निर्जीव आहे त्या सर्वांना कवीने साकडे घातले आहे व तसेच कवी, शाहीर यांनाही आवाहन करतो-

'ऐका हो गुणी शाहिरा, छंदि मुशाफिरा
लेखणी धरा, कवन करा ताजे

दुंदुभी रणाची आज भारती वाजे!
नवे जुन खंदे शाहीर, त्यांनी रणावर
शब्दांचे तीर सोडिले मौजे
म्हणुनीच तयांचे नाव अजुनही गाजे!''  (संग्रामगीते, पृ.७)

शाहिरांनो सर्व सोडून वीरवृत्तिचे गाणे गाऊन वीरवृत्तिला तुमच्या शाहिरीने उधाण आणा व वीरांचे पोवाडे गात रहा असे आवाहन करतो. 'मराठे गड्यानो' (पृ.१५) ही कविता महाराष्ट्रातील मराठी मनाची, मराठी माणसाची यशोगाथा सांगते आहे. मराठी माणूस क्षत्रिय तो लढावुवृत्तीचा आहे या कवितेवरती कवी कुंजविहारी यांच्या 'मराठा गडी यशाचा धनी' या कवितेचा ठसा उमटलेला आहे. मराठी भूमी शूरांची, वीरांची भूमी आहे. येथील भूमिला कुणी वाकड्या नजरेने पाहण्याचा प्रयत्न केला तर 'तुटोनी पडू त्यावरी व्याघ्रसे!' असे कवी म्हणतो. हा मराठी माणूस -

''जरी मोडलो लाखदा या शरीरी
परी एकदाही न वाकू कधी
असेच हाच बाणा मराठी तनूचा''  (संग्रामगीते, पृ. १५)

चीन आक्रमण झाले त्यावेळी प्रत्येक भारतीयांचे मन अग्नीकुंडासारखे भडकले होते. चीनला धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिक प्राणाची पर्वा न करता झुंजत होते. लहान मुलांपासून स्त्री, वृद्ध, प्रियकर, प्रेयसी यांची मने देखील देशाच्या प्रेमाने भारावलेले होते. अनेक वीर लढता लढता आपल्या प्राणाचे बलिदान करीत होते. अशाच एका मातेचा मुलगा आघाडीवर मरण पावला हे समजल्यावर शोक करणाऱ्या मातेस आवरताना 'माऊली तुला कसे आवरुं' (पृ.१४) ही कविता लिहिली. कवी कुंजविहारी यांच्या 'भेटेन नऊ महिन्यांनी' या कवितेचा ठसा थोडा फार उमटलेला आहे. 'हिंदी-चीनी भाई भाई' म्हणून गाफिल असताना चीनने भारतावर आक्रमण केले आणि त्यावेळी सैनिक मारला गेला त्यावेळी त्याची माता शोक करते, त्यावेळी तिची समजूत घालताना कवी म्हणतो-

''हिमालयाचे रक्षण करण्या सह्याद्री झुंजतो
आघाडीवर बहाद्दुरांना अपुल्या तो धाडतो
देश आपुला वीर गड्यांचा वीर तुझे लेकरुं!
देशच ज्यांचा प्राण असे हे सैनिक देशाचे''  (संग्रामगीते, पृ.१४)

नरवीरांच्या भूमीत नराधम राज्य करु इच्छितात पण ते कधी शक्य आहे काय? अशा नराधमाला मारता मारता तुझा पुत्र अमर झाला अशा मुलाला जन्म देऊन धन्य झालीस माते. हे सर्व तुझेच पुत्र

आहेत त्यांना पंखाखाली घे.

प्रत्येक भारतीय नागरिक हा देशप्रेमाने भारावलेला आहे. काही सैनिक दिवाळीची सुट्टी घेऊन घरी येतात. त्याचवेळी चीनने भारतावर आक्रमण केले. प्रियकर-प्रेयसीच्या गप्पात प्रेयसी-सैनिक असलेल्या प्रियकराला आळवणी घालते-

''प्रियकरा जा रे सीमेवरी
तुझ्या नि माझ्या प्रीतीची ही इथेच सीमा खरी' (संग्रामगीते, पृ. १८)

तू जिंकून आलास तर तुझ्या गळ्यात वरमाला घालीन आणि अमर झालास तर तुझी माझी भेट पुढील जन्मी होईल. असाच देशप्रेमाने भारावलेला तरुण सैनिक आपल्या प्रेयसीला 'अखेरचे पत्र हे' (पृ.२४) लिहित आहे. आपल्या भूमीवर आलेल्या संकटाचे निवारण करुनच परत येईन नाहीतर लढता लढता तेथेच माझा प्राण गेला तरी त्याची पर्वा तू करू नकोस. अशीच नवरा बायको यांची नाट्यगीत 'सोनं झालंया स्वस्त.' (पृ.८) यात सोनं झालंय स्वस्त म्हणून बायको सारखा हट्ट करु लागलेली आहे. भारतावर आक्रमण झाल्यामुळे भारताची आर्थीक बाजू पूर्ण कोलमडली आहे. त्यासाठी सोन्यांचा भाव कमी करुन युद्धासाठी पैसा कमी पडू नये म्हणून असे केले आहेत असे समजावून आपल्या पत्नीला सांगतो. त्यावेळी तिची देशभक्ती जागी होत आणि म्हणते -

''सोनं झालंय स्वस्त-कारभारी सोनं झालंया स्वस्त
विजयी होऊन याल तुम्ही मग अजून होईल स्वस्त'' (संग्रामगीते, पृ. ९)

ज्यांच्या त्यांच्या तोंडी देशभक्तिचे गाणेच ऐकायला मिळते, असे वातावरण कवीने निर्माण केले त्या जात्यावर लोकगीतांप्रमाणे ओवी म्हणणारी स्त्री देखील देशभक्तिपर गीतच गाते 'देश माझा गं सोन्याचा' (पृ.२१) या संग्रामगीतातूनही देशभक्तीच गायलेली आहे.

**बालसंग्रामगीते :**

रा. ना. पवारांनी स्फुर्तिगीते, संचलनगीते, स्त्रीगीते याबरोबरच काही बालसंग्रामगीतेही लिहिली आहेत. समाजातील प्रत्येक वर्ग चिन आक्रमणाने व्याकुळ झाला आहे.

'मायभूमिची सेवा करु दे थोडी' (पृ. १०) या बालसंग्रामगीतातील बालक आपल्या आईला म्हणतो -

''आई दे मज खाकी टोपी, शर्ट आणखी चड्डी

बंदुक घेऊन नरम करिन मी चिनी शत्रूची हड्डी!''  (संग्रामगीते, पृ. १०)

ज्या चीन देशाला भाई समजले तेच कसाई होऊन आपल्यावर आक्रमण केले. त्यांना धडा शिकविण्यासाठी सर्व जवान एकत्र येऊन लुटावयास बसलेल्या या शत्रूला नरम करुन पाठवू. लहान मुलाला 'चिनी' शब्द इतका भयानक वाटतो की, 'दुष्ट शब्द तो नको 'चिनी'(पृ.१३) या बालगीतात बालक म्हणतो, 'पिवळे, बुटके, नकटे, चपटे यांचे नावच घेऊ नका.' यांची जात ढेकणासारखी रक्तपिपासू आहे आणि घरात आई मसालेभात करताना त्यात 'दालचिनी' घालू नकोस कारण त्यात 'चिनी' शब्द आहे. इतका तिटकारा त्यांनी 'चिनी' शब्दाविषयी व्यक्त केला आहे.

आपल्या हिंदू धर्मात 'दिवाळी' हा सर्वात मोठा सण आहे. या सणाच्या वेळेस चीनने भारतावर आक्रमण केले. पति रणांगणावर गेला आहे आणि एकुलता एक मुलगा असलेला मुलगा सैनिकाचा वेष धारण करुन 'आई मला ओवाळ, मला लढाईवर जायचं आहे!' म्हणतो. तेव्हा त्याची आई त्याला म्हणते -

''वेष लष्करी करुन होशी तू ही बाल शिपाई!
परकीयांच्या आक्रमणाची चीड तुलाही आली
भारतपुत्रा, तुला पाहुनी आई धन्य जहाली!''   (संग्रामगीते, पृ.१३)

आम्ही दुसऱ्याच्या भूमिवर डोळा ठेवत नाही पण आमच्या भूमीवर कुणी वाकडी नजर करुन पाहिले तर ते आम्हाला सहन होणार नाही. त्यासाठी आम्ही बलिदानही करु त्याची आम्हाला पर्वा नाही. या भूमिला वीरतेचा वारसा आहे आणि तुझे वडिल विजयी होऊन आल्यानंतर 'दोघे मिळुनी असेच त्यांना ओवाळू लडिवाळ!' असे म्हणून त्याची समजूत घालते. तसेच **'चिनी माऊचा बोका'** (पृ.१९) हे बालगीत विनोदी व विडंबनधर्तीवर आहे. या बालगीतातील कल्पना फार सुंदर केलेली आहे. उदा.

''भिंतीवरुनी घरांत येईल चिनी माऊचा बोका
दुधास अपुल्या धोका- याला मिळेल त्याने ठोका!''   (संग्रामगीते, पृ. १९)

साऱ्या भारत देशात चीनविरुद्ध कोलाहल माजले आहे. मित्रराष्ट्र शेजारी म्हणून विश्वास ठेवला असता अचानक याने कपटाने हल्ला केला आहे. 'आव्हान तुझे यशवंत' (पृ. २२) या कवितेत कवीने चीनचा आत्मघातकी डाव कसा आहे याचे वर्णन केलेले आहे. ज्यावेळी युद्ध पेटले. भारतीय सेना प्राणाची पर्वा न करता झुंजत आहे, त्यावेळी क्षणात नरम होऊन वाटाघाटीची बोलणी करतात आणि क्षणात दमदाटीची भाषा करतात. हे सरड्याप्रमाणे रंग बदलणाऱ्यांना डगमगायचे नाही, तर एकदा

असे त्यांच्याशी 'होऊ द्याच संग्राम' कवी म्हणतो. आपल्या देशाला यशवंताचा वारसा आहे. त्यामुळे यश हे आपलेच आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात व चीन-भारत युद्ध झाल्यानंतर आपल्या मायभूमीसाठी अनेक तरुण आपल्या प्राणाची आहुती देऊन आपल्या देशाशी इमान राखून इंच इंच जागेसाठी लढले आहेत व त्यासाठी अनेकजण आपले प्राणही दिले आहे. अमर झालेल्या नरवीरांना श्रद्धांजली वाहण्यासाठी कवीने ही शब्दांजली वाहिली आहे-

''सीमेवरच्या बहादुरांनो तुम्हास कोटि प्रणाम
आमुचे तुम्हास कोटि प्रणाम
स्वातंत्र्याच्या पूजेआधी घेऊ तुमचे नाम!''(संग्रामगीते, पृ.५)

आपली लहान मुले, लेकरे, बायका सर्व सोडून रणांगणावर झेप घेतलेल्या नरवीरांना कोटी प्रणाम करून आपल्या भूमिला शत्रूपासून वाचविण्यासाठी रक्तांचा सडा शिंपून, शौर्याचे पोवाडे गाणारी ही भारतीय परंपरा आहे. देव्हाऱ्यातील देवाइतकी पवित्रता तुमच्या नावात आहे असे म्हणून कवी वीरांची धन्यता मानतो.

रा. ना. पवारांच्या राष्ट्रीय कवितांचा परामर्श घेताना असे जाणवते की, त्यांच्यात प्रखर राष्ट्रभक्ती आहे. स्वातंत्र्यपूर्वकालखंडात जी राजकीय आंदोलने झाली आणि त्याकाळातील राष्ट्रीय नेत्यांमध्ये जो ध्येयवाद होता त्यातून त्यांना राष्ट्रभक्तिची प्रेरणा मिळाली व तसेच त्यांनी आपल्या परीने आंदोलनात भाग घेतला. त्याबरोबरच राष्ट्रभक्ती हा त्यांचा अनुभव आहे. त्यामुळे त्यांची राष्ट्रीय कविता ही केवळ सहानुभूतीची न बनता अनुभवाची बनलेली आहे. त्यांच्या राष्ट्रीय कवितेतील अभिव्यक्ती साधी, सोपी बनली असली तरी त्यात प्रामाणिकपणा असल्याची उत्कटता आढळते. डॉ.निर्मलकुमार फडकुले यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, ''कै. रा. ना. पवार हे मनस्वीवृत्तीचे कवी होते. जे आपल्या अंत:करणप्रवृत्तीला पटते त्याचा त्यांनी उद्घोष केला. आणि जे पटत नाही त्याचा त्यानी तीव्र स्वरात धि:क्कारही केला. जीवनाकडे पाहण्याची त्यांची हीच दृष्टी होती. त्याचं मन निकोप होतं. भावना उत्कट होती. भाषा रगेल होती. या स्वभावाच्या कित्येक रंगछटा त्यांच्या कवितेतही उमटाव्यात हे स्वाभाविक आहे. ऐखाद्या करुणोदात्त अनुभवानं ते भावविवश होत असत. त्यांच्या डोळ्यात अशावेळी अश्रू उभे राहतात पण एखाद्या सामाजिक विसंगतीनं अन्यायानं ते प्रक्षुब्ध होऊन उठत असत, त्यावेळी त्यांची कविता, ज्वालाग्राही होत असे. उत्कटतेवर आणि भव्यतेवर ते लुब्ध असायचे, 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' अशी अवस्था झाली की त्यांच्या मनात गाणं जागं व्हायचं.''[१९] याचा प्रत्यय येतो.

**गौरवगीते :**

रा. ना. पवार माणसावर प्रेम करणारे आहेत. माणसातील ज्या माणसाचे जीवन अलौकिक कर्तृत्वाने बहरलेले असते, त्यांच्याविषयी त्यांच्या मनात अपार भक्तिभावना, आदरभावना आहे. मग ती व्यक्ती भक्तिसंप्रदायातील असो, राजकारणातील असो किंवा साहित्यातील असो. त्या व्यक्ति समाजजीवनासाठी आणि राष्ट्रजीवनासाठी जे कार्य केले आहे ते त्यांना वंदनीय वाटते. या संबंधीच्या कवितांमध्ये भक्तिसंप्रदायातील ज्ञानेश्वर, रामदास आणि इतर संत, राजकीय क्षेत्रातील लोकमान्य टिळक, स्वामी दयानंद, पंडित नेहरु, साहित्यक्षेत्रातील आचार्य अत्रे, स्वामी दयानंद सरस्वती यांच्याविषयी त्यांनी काही कवितेत कृतज्ञता भाव व्यक्त केला आहे.

**संतांचे दर्शन :**

थोर महात्म्यांच्या व्यक्तित्वासंबंधी व कार्यासबंधी त्यांच्या मनात आदरभाव असल्याने त्यांनी त्यांचा गीतांतून गौरव केला. भागवत धर्माचा पाया रचणारे ज्ञानेश्वर म्हणजे एक थोर सामाजिक क्रांतीकारक आणि साहित्यिकसुद्धा. कोणत्याही मराठी माणसाला अभिमान वाटावा असे ज्ञानेश्वराचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व आहे, याचा कवीला अभिमान वाटतो. 'ज्ञानियांचा राजा' (पृ.७४) या कवितेत त्यांनी ज्ञानेश्वरांचा गौरव केला आहे. सामान्य जनासाठी भगवत्गीतेतील आध्यात्मज्ञान त्यांनी मराठीत आणले आणि 'सामान्यजनाची ज्ञानतृष्णा तृप्त केली. म्हणून ते म्हणतात -

''ज्ञानीयांच्या राजा तुझी एक ओवी
अंतरी रुजावी हीच मुक्ती'' (सावळ्या विठ्ठला, पृ.७४)

संत नामदेवांनी ज्ञानेश्वरांची एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले आहे पण हा कवी म्हणतो 'ज्ञानेश्वराच्या एक ओवी अंत:करणात रुजविल्याने मुक्ती मिळेल.' अशीच कृतज्ञता त्यांनी 'समर्थ रामदास स्मृती' (पृ.७५) या कवितेत व्यक्त केली आहे. संत रामदास हे राजकारणी, संत की कवी असा प्रश्न कवीला पडतो, परंतु अर्जुनाला ज्याप्रमाणे कृष्ण भेटला आणि कर्तृत्वाची प्रेरणा दिली. त्याप्रमाणे छत्रपती शिवाजीना रामदास भेटल्याने शिवाजीने अलौकिक पराक्रम केला. राजकारण आणि समाजकारण यासबंधी रामदासानी 'दासबोधा'तून जो उपदेश केला तो अत्यंत महत्वाचा आहे. हे सर्वानीच कबूल केले आहे. रामदासामुळे महाराष्ट्रीय जनतेला प्रपंच परमार्थ, राजकारण, समाजकारण या क्षेत्रात प्रेरणा मिळाली म्हणून कवी म्हणतो -

''तुझ्या कृपेचे खुलता दालन

अन्यायाचे करु निर्दालन
न्याय मिळवूनी माय मराठी बसवू वैभवशिखरी
समर्थ तुझी ज्योत जागते जनमानसमंदिरी'' (सावळ्या विठ्ठला, ७५)

असाच कृतज्ञता भाव 'संताचे दर्शन' (पृ. ८८) या कवितेत त्यांनी व्यक्त केला आहे. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम यांचे साहित्य वाचताना त्यांना 'संताचे दर्शन' होते आणि ब्रह्मरुप प्रकटते. त्या दर्शनामुळे आपले डोळे आणि अंग दंग झाले. आपल्यावर संतकृपा झाली त्यामुळे

''नाही मज भीती जन्ममरणाची
संतदर्शनाची कृपा होता'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८८)

असा उत्कट भाव व्यक्त केला आहे. याच भूमिकेत 'यशोदा' (पृ.५६) या कवितेत एका श्रेष्ठ मातेचे गुणगान गायिले आहे. 'विश्वाचा पालनकर्ता ' असलेल्या व जगाला गीतेचा संदेश देणाऱ्या कृष्णाचा सांभाळ यशोदेने मातृभावनेने केला आणि त्यासाठी आपल्या पोटच्या मुलाचा बळी दिला म्हणून या जगावेगळ्या मातेचा त्यांनी गौरव केला आहे.

**महापुरुषांचे वर्णन :**

अशाच प्रकारची कृतज्ञता त्यांनी राजकीय क्षेत्रातील महानपुरुषांविषयी व्यक्त केले आहेत.'लोकमान्य टिळकस्मरण' (पृ.७८) या कवितेत त्यांनी टिळकांविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. 'जन्मसिद्ध हक्क मम स्वराज्य हो खरा' असे मानून लोकमान्यांनी आयुष्यभर तन-मन-धनाने राष्ट्रसेवा केली. आणि तरुणांना 'तरुणांनो शूर व्हा!', 'दास्याची लाज मनी बाळगा जरा' असा संदेश दिला. अशा टिळकांविषयी ते म्हणतात -

''ध्येयापासून तिळ न दूर जाहला
अढळ निश्चयी हा ध्रुव मूर्त भासला
सत्याचा झालासी दास तू दास पुरा!'' (सावळ्या विठ्ठला, पृ.७८)

या शब्दांत टिळकांचे थोरपण त्यांनी व्यक्त केले आहे. 'स्वामी दयानंद' (पृ.७६) या कवितेत त्यांनी 'स्वामी दयानंद सरस्वती' यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. स्वामी दयानंद सरस्वती यांनी धर्माच्या आधारे राष्ट्रीय भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी स्वदेशीचे, ब्रह्मचर्याचे व्रत पाळले त्याहीपेक्षा त्यांनी विद्येचा प्रसार केला. त्यांची ही धर्मनिष्ठा राष्ट्रभावना कवीला आदरणीय

वाटते म्हणून ते म्हणतात -

> ''भारतीय संस्कृति संगोपन
> त्याग नि सेवेची तव शिकवण
> 'जागते रहा' आम्हास सांगून
> आत्माविण तू देह ठेविला अमर जगी होवुनी'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७७)

लोकमान्य टिळक आणि दयानंद सरस्वती यांच्याविषयी हा कवी आदरभाव बाळगतो कारण या दोघांच्या राष्ट्रभक्तिला भारतीय संस्कृतीचे, आध्यात्मिक तत्वज्ञानाचे अधिष्ठान आहे. स्वतः रा. ना. पवारांना भक्तिभावना आवडत असल्याने आणि राष्ट्रप्रेमाचे आकर्षण असल्याने त्यांना दोन व्यक्तिविषयी आदरभाव वाटत असावा. भारतीय राजकारणातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे महात्मा गांधी त्यांच्याविषयीचा आदरभाव 'माझा संभ्रम मिटेल का?'(पृ.७९) या कवितेत व्यक्त केला आहे. त्याच महात्मा गांधीचे आवडते शिष्य आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्याविषयीही त्यांना आदरभाव वाटतो. श्रीमंत असूनही सुखासीन जीवन न जगता पंडित नेहरुंनी या देशासाठी अनंत हालआपेष्टा भोगली, कारण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी देशाला नवा आकार देण्यासाठी आयुष्य झिजविले. यांचे कवीला आकर्षण वाटते. सन १९६४ मध्ये त्यांच्या अकाली निधनाने कवीला झालेले दुःख ते 'हास्य आज मावळले' (पृ. ७९) या कवितेत व्यक्त झाले आहे. त्या दुःखापेक्षा पं. नेहरूंच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचा त्यांनी या कवितेत अत्यंत सुंदर आणि समर्थ शब्दांत आविष्कार केला आहे. ते म्हणतात -

> ''ज्या हास्याने स्वतःबरोबर विश्व हासरे केले
> ते हास्य आज मावळले'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७९)
> ...
> ''हास्य, गती अन् तेजयुक्त जे नाव सदेह तळपले
> ते नावच आता उरले
> त्या नावाला त्या आत्म्याला अमरत्वाने वरिले
> अमरत्व धन्यता ल्याले.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७९)

**प्रज्ञावंताचे दर्शन :**

अशाच भावनेतून त्यांनी साहित्यातील प्रज्ञावंताविषयी आदरभाव व्यक्त केला आहे. 'तूं आवर अश्रूंची ही धार!'(पृ.८०) ही कविता सोलापुरातील एकश्रेष्ठ राष्ट्रकवी कुंजविहारी यांचे दुःखपूर्ण

आत्मनिवेदन ऐकत असताना कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या डोळ्यांतील ओघळत असलेले अश्रू पाहून या कवीला ही कविता सुचली. त्यातून कवीची आणि बा. भ. बोरकर यांची सहृद्यता व्यक्त होते. कवी कुंजविहारीप्रमाणे कवीने त्यांच्या प्रवृत्तीशील आचार्य अत्र्यांचा 'आचार्य अत्रे' (पृ. ७२) या कवितेत गौरव केला आहे. आचार्य अत्रे हे 'ज्ञानवंत आणि प्रज्ञावंत' पण, 'एकाही शिष्याला अंगठा न मागणारा तू द्रोणाचार्य' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७२) असे त्यांचे व्यक्तित्व. आचार्य अत्रे यांनी आपल्या साहित्याने समाजातील व्यक्तिंच्या ढोंगीपणावर प्रहार केले. विनोदाच्या सहाय्याने लोकांना हसविले, सुंदर मृत्युलेख लिहून लोकांना रडविले, विनोदी, करुण नाटके लिहिली लोकांना 'हसू आणि आसू' आणले. विविध क्षेत्रात त्यांनी अफाट कर्तृत्व दाखविले म्हणून कवी आदराने व गौरवाने म्हणतो-

''तुझ्या कर्तृत्वाची लांबी रुंदी पृथ्वीच्या पट्टीने मोजावी
तुझ्या ज्ञानाची उंची हिमालयाच्या टेपाने मोजावी
तुझ्या उदारतेची खोली सागराच्या मीटरने मोजावी.'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ७३)

**सोलापूरचे वर्णन :**

रा. ना. पवारांच्या भक्तिभावनेतून आणि राष्ट्रप्रेमातून निर्माण झालेले आणखी एक गीत म्हणजे 'या मातीचा टिळा'(पृ. ८७) ही कविता होय. सोलापूरच्या या मातीत कवी लहानाचा मोठा झाला. त्याच सोलापुरात त्यांनी गौरवभाव व्यक्त केला आहे. सोलापूर शहरात भक्तिची, राष्ट्रभक्तिची, साहित्याची एक श्रेष्ठ परंपरा आहे, म्हणून कवीला सोलापूरचा अभिमान वाटतो. पंढरपूरचा 'विठोबा', बार्शीचा भगवंत, तुळजापूर व सोलापूरची 'भवानी' यांनी या शहराचे रक्षण केले आहेत. या शहराला कळिकाळाचे भय नाही 'येथे सिद्धेश्वर हे भक्तिचे पीठ आहे, तर रुपाभवानी शक्तीचे पीठ आहे.' या शहराला हुतात्म्याचा दिव्य वारसा लाभला आहे. संतकवी शुभराय यांच्यामुळे कला व भक्तिचा संगम झाला आहे म्हणून-

''जे जे उज्वल पवित्र मंगल शिर तिथे नमवू
या मातीचा टिळा कपाळी श्रद्धेने मिरवूं!'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८७)

असे कवी अभिमानाने म्हणतो. सोलापूरचा अभिमान व्यक्त करताना कवी पुढे म्हणतो-

''सोलापूर शहर आमुचे आहे भाग्याचे
इथे कुणाला दिवस न येतील कधी अभाग्याचे'' (सावळ्या विठ्ठला, पृ. ८७)

रा. ना. पवारांच्या या सर्व गौरवगीतपर कविता वाचल्या की त्यातून त्यांची भक्तिभावना दिसते.

राष्ट्रभावना दिसते, साहित्यप्रेम दिसते. त्या थोर व्यक्तींच्या कर्तृत्वाबद्दल ते नतमस्तक झालेले दिसतात. यांनी लिहिलेली 'संग्रामगीते' व 'गौरवगीते' प्रासंगिक असली तरी त्यातून त्यांची संताविषयी भक्तिभावना, राष्ट्रीय नेत्याविषयी आदरभाव व सोलापूर सारख्या कर्तृत्वभूमीबद्दल वाटणारा अभिमान उत्कटपणे व्यक्त झाला आहे. त्यापाठीमागे कवीचे प्रामाणिक मन असल्यामुळे 'हे वंदे मातरम् गीता' (पृ.४४) 'ज्ञानियांचा राजा' (पृ.७४) 'हे हास्य आज मावळले' (पृ.७९) या कविता वैशिष्ट्यपूर्ण वाटतात.

## प्रकरण दुसरे-संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | चंद्रभूषण कुलश्रेष्ठ, | :- | *'बहुढंगी व्यक्तिमत्व - रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर दि. ३/८/१९८६. |
| २. | जॉनसन | :- | Theory of Literature. |
| ३. | रा. ना. पवार | :- | *'मी आणि माझी कविता'* आकाशवाणी केंद्र, सोलापूर. |
| ४. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'सावळ्या विठ्ठला'* प्रस्तावना पृ. ४. |
| ५. | रा. ना. पवार | :- | *'वृत्त'* दै. संचार, सोलापूर दि. ३0 जुलै १९९८. |
| ६. | दिवाकर दुनाखे | :- | *'कविवर्य रा. ना. पवार एक जीवनाभिमुख व्यक्तिमत्व'* दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९७५. |
| ७. | W.H. Hudson | :- | ***'An introduction to the study of English Leteature'*** 4th Indian Edition 1971. Page No. - 15. |
| ८. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'आशेची गीते गाणारा कवी श्री. रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९७२. |
| ९. | रा. ना. पवार | :- | *'सुरेश करंदीकर यांनी घेतलेली मुलाखत'* (का.ना.) |
| १०. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'आशेची गीत गाणारा कवी श्री. रा. ना. पवार'* दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९७२. |
| ११. | निर्मलकुमार फडकुले | :- | *'प्रस्तावना'* सावळ्या विठ्ठला' पृ. ५ व ६. |
| १२. | रंगा वैद्य | :- | *'संपादकीय'* दै. संचार, सोलापूर दि. ३0/७/९८ |
| १३. | कवी संजीव | :- | *'सावळ्या विठ्ठला'* दै. केसरी, सोलापूर दि. ३ ऑगस्ट |

१९८६.

१४. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ :- *'बहुढंगी व्यक्तिमत्व :- रा. ना. पवार'*
दै. संचार, सोलापूर दि. ३/८/१९८६.

१५. निर्मलकुमार फडकुले :- *'आशेची गीत गाणारा कवी श्री. रा. ना. पवार'*
दै. संचार, सोलापूर दि. २१ जुलै १९७२.

१६. चंद्रभूषण कुलश्रेष्ठ :- उनि.

१७. रा. ना. पवार :- *'९ ऑगस्ट १९४२ चा सोलापूरातील मोर्चा आणि मी'*
दै. संचार, सोलापूर दि. ९ ऑगस्ट १९९१.

१८. रा. ना. पवार :- *'संग्रामगीते'* मलपृष्ठांवरून उद्‌धृत.

१९. निर्मलकुमार फडकुले :- *'सावळ्या विठ्ठला'* प्रस्तावना पृ. ३.